CMYK

२१ रमजान मुबारक
आज का इफ्तार ६.३९
कल की सहेर ५.१६

# पार्श्वभूमी

रियांश एन्टरप्राईजेस
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही.
50% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.92 व 93 सारडा सेंट्रल, डी.पी.रोड, बीड.
Mob.9511511818

बीड वर्ष ३६ वे अंक १०१ वा फोन २३०१०१ दिनांक ११ मार्च २०२६ बुधवार
गंमत भंडारी
ई-पेपर : www.parshvbhumi.com
Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501
पाने ६ किंमत ४रु.

# पुढाऱ्यांनो, रेल्वेचं काम पूर्ण करायचंय हे विसरलात का?

## धनूभाऊ, प्रकाशदादा तुम्ही अधिक लक्ष दिलं तरच हे होईल



**बीड दि.१० (प्रतिनिधी):- अहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथ रेल्वेच्या कामासाठी निधीची कुठलीही कमतरता नाही, फक्त काम वेगाने पूर्ण होण्याची गरज आहे. बीडपर्यंत डेमू रेल्वे आली परंतु परळीपर्यंतचा टप्पा अजुन पूर्ण झालेला नाही. वडवणीपर्यंत हायस्पीड चाचणी झाली, परंतु पुढचं काम अजुनही संथ गतीने सुरु आहे. बीडच्या रेल्वेच्या प्रश्नी लोकप्रतिनिधी एवढे सुस्त का? असा प्रश्न निर्माण झाला आहे. खासदार, आमदारांनी याकडे लक्ष देण्याची गरज आहे. विशेष करुन राहिलेल्या टप्प्याचे काम पूर्ण होण्यासाठी आ.धनंजय मुंडे आणि आ.प्रकाश सोळंके यांनी जास्तीचे लक्ष दिले, सतत आढावा घेतला तर हे काम निर्धारीत वेळेत पूर्ण होईल.**

बीड जिल्हावासियांच्या महत्वाच्या अशा अहिल्यानगर-बीड-परळी बहुप्रतिक्षीत रेल्वे मार्गाला काही महिन्यापुर्वी गती मिळाली होती. त्यामुळे बीडपर्यंत रेल्वे आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तत्कालीन उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांच्यासह जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत अहिल्यानगर-बीड रेल्वे सेवेचा मोठ्या थाटात शुभारंभही झाला होता. त्याचवेळी उपस्थित मान्यवरांनी परळीपर्यंत लवकरात लवकर रेल्वे धावेल असा शब्द जिल्हावासियांना दिला होता. मात्र गेल्या काही महिन्यापासून या प्रश्नाकडे सर्वच लोकपतिनिधींचे दुर्लक्ष झाले आहे. जिल्ह्यातील एकही लोकप्रतिनिधी रेल्वेच्या प्रश्नावर शब्दही बोलत नाही. बीड ते वडवणीपर्यंत रेल्वेची हायस्पीड चाचणी झाली, मात्र तिथून पुढे रेल्वेचे काम अतिशय धिम्या गतीने सुरु आहे. भोपा व इतर ठिकाणच्या परिसरात काही लोकांनी रेल्वे मार्गाचे काम रोखले आहे. जिथे सुरु आहे त्या ठिकाणीही अतिशय संथ गतीने काम केले जात आहे. बीड जिल्ह्याचे खा.बजरंग सोनवणे बीडमध्ये येऊन महिन्या, दोन महिन्याला एखादी बैठक घेतात मात्र बैठकीत अधिकारी नेहमीचाच पाढा वाचतात. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सुद्धा या प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. खरं तर जिल्हाधिकाऱ्यांनी दर आठ दिवसाला बैठक घेऊन या कामाचा आढावा घेणे आवश्यक आहे. जिथं काम थांबलयं तिथं पान २ वर

## अवैध वाळू वाहतुकीसाठी हप्ताखोरी

# चकलांब्याचे एपीआय संदीप पाटील, सुरवसे ५० हजारासाठी जाळ्यात

**बीड दि.१० (प्रतिनिधी):- जिल्ह्यात अवैध वाळू वाहतुकीवर पोलिसांकडून सातत्याने कारवाई केली जाते, मात्र त्यातही सर्रास हप्तेखोरी सुरु असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आल्याने बीड जिल्हा पोलीस दलाची प्रतिमा मलीन झाली आहे. गेवराई तालुक्यातील चकलांबा पोलीस ठाण्याचे एपीआय संदीप पाटील आणि पो.कॉ.विनोद सुरवसे यांना मंगळवारी रात्री १० वाजण्याच्या सुमारास उमापूर (ता.गेवराई) येथे ५० हजार रुपयांची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडले. वाळुच्या गाड्या सुरु ठेवण्यासाठी संबंधीत पोलीस अधिकाऱ्याने दरमहा ६० हजार रुपयांची मागणी केली होती. तडजोडीअंती ५० हजार रुपये देण्याचे ठरले. त्याच वेळी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ही कारवाई केल्याने खळबळ उडाली आहे.**



एपीआय संदीप पाटील



पो.कॉ.सुरवसे

गेवराई तालुक्यातील चकलांबा पोलीस ठाणे हद्दीतून वाळुच्या गाड्या बिनदिक्कतपणे सुरु ठेवण्यासाठी दरमहा ६० हजार रुपयांच्या लाचेची मागणी करण्यात आली होती. तडजोडीअंती ५० हजार रुपये देण्याचे ठरल्यानंतर संबंधीत तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. त्यानुसार मंगळवारी रात्री १० वाजण्याच्या सुमारास उमापूर येथे पोलीस कर्मचारी विनोद सुरवसे हा पैसे स्वीकारण्यासाठी आला त्याचवेळी त्याला ५० हजार रुपयांची लाच स्वीकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले. या प्रकरणात चकलांबा ठाण्याचे स.पो.नि. संदीप पाटील यांनाही लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेतले असून दोघांविरुद्ध रात्री उशिरापर्यंत कायदेशीर कारवाई सुरु होती. ही कामगिरी डीवायएसपी सोपान चिट्टमपल्ले, अमोल खरसाडे, मच्छिंद्र बीडकर, पान २ वर

## जिल्हा परिषदेच्या पंचायत विभागाचे विस्तार अधिकारी शाहीर निलंबित

बीड दि.१० (प्रतिनिधी):- विहित कालावधीत माहिती न देणे, वरिष्ठांच्या अध्यादेशाचे पालन न करणे, चौकशी अहवाल सादर न करणे आणि इतर कारणावरून बीड जिल्हा परिषदेच्या पंचायत विभागातील शिरूर कासार येथील विस्तार अधिकारी पी. बी. शाहीर यांना तडकाफडकी निलंबित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांनी दि.१० मार्च रोजी सदर निलंबनाचे आदेश काढले आहेत.

विस्ताराधिकारी शाहीर यांना यापूर्वीही पंचायत विभागामार्फत नोटीस देऊन कर्तव्यात कसूर न पान २ वर

# बीडच्या स्टेडियमवरील खो खो ग्राऊंडवर कचऱ्याचे साम्राज्य

## क्रीडा अधिकारी ऑफीसच्या बाहेर निघत नाहीत







**बीड दि.१० (प्रतिनिधी):- येथील जिल्हा स्टेडियमवर असलेल्या खो खो ग्राऊंडवर मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे साम्राज्य निर्माण झाले आहे. क्रीडा अधिकारी कार्यालय या ग्राऊंडवर स्पर्धा घेण्यासाठी मानधन घेतात, परंतु ज्यांच्याकडून मानधन घेतले जाते ते स्पर्धा झाल्यानंतर ग्राऊंड साफ करत नाहीत, ग्राऊंडवरच केळाचे साल, रिकामे नारळे, खाद्य पदार्थांचे रॅपर्स पडलेले असते त्यामुळे मोठ्या प्रमाणात कुत्रे व इतर जनावरे याकडे आकर्षित होत आहेत. क्रीडा अधिकारी नुसते कॅबीनमध्ये बसून असतात. ग्राऊंडवरील स्वच्छतेकडे त्यांचे कधीच लक्ष नसते. या स्टेडियमला स्टीलचे गेट बसविण्यात आले आहे. ज्याच्या खालून कुत्रे व इतर जनावरे सहज मैदानात येतात. इतके उंच गेट का बसविले? भविष्यात रस्ता भरुन आल्यानंतर गेट उघडायला अडचण होऊ नये म्हणून आताच गेट दोन फुट उंच घेतले आहे.**

येथील जिल्हा स्टेडियमवर गेल्या अनेक वर्षापासून सकाळ, संध्याकाळ वेगवेगळे खेळ खेळले जातात. वेगवेगळ्या क्रीडा असोशिएशन यात सहभागी असतात. मागील २९ वर्षापासून डॉ.तानाजी आगळे आणि त्यांच्या पत्नी या ग्राऊंडवर विद्यार्थी, विद्यार्थिनींना खो खो चे मोफत प्रशिक्षण देतात, त्यासाठी त्यांनी स्वत: मेहनतीतून ग्राऊंड तयार केले आहे. दररोज या ग्राऊंडची ते साफसफाई करतात. परंतु अलिकडच्या काळात या ग्राऊंडवर मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण झाला आहे. क्रीडा अधिकारी कार्यालय बाहेरील शाळांना मानधन घेऊन हे ग्राऊंड देतात. ग्राऊंड हे खेळासाठी आहे, दिले तर हरकत नाही परंतु ज्यांना पैसे देऊन हे वापरायला दिले त्यांनी वापर झाल्यानंतर ते व्यवस्थीत ठेवणे गरजेचे आहे, मात्र त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण केला जातो. याचा त्रास दररोज पान २ वर

## आता महिनाभरात होणार जमीन मोजणी

मुंबई दि.१० (प्रतिनिधी):- राज्यातील प्रलंबित मोजणी प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी आणि नागरिकांना जलद सेवा देण्यासाठी महसूल विभागाने महत्वाचे पाऊल उचलले आहे. आता शासकीय मोजणी कामी खासगी परवानाधारक भूमापकांची नियुक्ती करण्यात आली असून ३० मार्च २०२६ पासून हे भूमापक प्रत्यक्ष मैदानात उतरणार आहेत अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधिमंडळाच्या सभागृहात पान २ वर

# स्थायी समितीची परवानगी न घेताच मोठी रक्कम कोटक बँकेत वर्ग करण्याच्या हालचाली

## ■ अमरनाना, फारुक पटेल, निजामभाई लक्ष घाला ■

बीड दि.१० (प्रतिनिधी):- येथील नगर पालिकेच्या खात्यातील कोट्यावधी रुपयांची रक्कम कोटक महिंद्रा बँकेमध्ये नवे खाते उघडून वर्ग करण्याच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. अशा पद्धतीचा निर्णय स्थायी समितीची परवानगी घेतल्याशिवाय घेता येत नाही. मात्र नियमांना फाटा देत हा निर्णय घेतला जात असल्याचे समजते. स्थायी समितीचे अमर नाईकवाडे, ज्येष्ठ नगर सेवक फारुक पटेल, सभापती निजामभाई यांनी





या प्रकरणात लक्ष घालण्याची गरज आहे.

बीड नगर पालिकेचे एचडीएफसी बँकेमध्ये खाते आहे, या खात्यावर कोट्यावधी रुपयांची रक्कम आहे. अजुन एका दुसऱ्या बँकेत असलेल्या खात्यातही मोठी रक्कम आहे. या दोन्ही रकमा कोटक महिंद्रा बँकेमध्ये वर्ग करण्याच्या हालचालींना सुरुवात झाली आहे. नियमानुसार पान २ वर

## कडक उन्हाळा जाणवू लागला

बीड दि.१० (प्रतिनिधी):- होळी नंतर ऋतुमध्ये बराचसा फरक पडतो. थोडीफार जाणवत असलेली थंडीही आता जाणवत नाही. कडक उन्हाळा जाणवू लागला आहे. बंद पडलेले पंखे सुरु झाले आहेत.

# टीईटी आणि सीटीईटी परीक्षा उत्तीर्ण होणारांची एकत्रित अंतिम सेवा ज्येष्ठता यादी प्रसिद्ध करणार

## आश्वासनानंतर शिक्षकांचे उपोषण स्थगित

बीड दि. १० (प्रतिनिधी):- टीईटी आणि सीटीईटी परीक्षा उत्तीर्ण होणारांची एकत्रित अंतिम सेवा ज्येष्ठता यादी प्रसिद्ध करणार असे आश्वासन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शिक्षणाधिकारी यांनी दिल्याने पदवीधर शिक्षकांचे आमरण उपोषण स्थगित करण्यात आले आहे. पदवीधर शिक्षकांचे आमरण उपोषण सोडविण्यासाठी गेवराई मतदार संघाचे आ.विजयसिंह पंडित यांच्या मदतीने नगर परिषदचे उपनगराध्यक्ष विनोद मुळुक यांनी बजावली मध्यस्थितीची भूमिका बजावली.



बीड जिल्हा परिषद समोर दि.९ मार्च २०२६ पासून पदवीधर शिक्षक संघटनेच्या माध्यमातून अनेक शिक्षक आमरण उपोषणास बसले होते. बीड जिल्हा परिषद केंद्रप्रमुख प्रमुख पदोन्नती प्रक्रिया राबवित आहे. केंद्रप्रमुख पदोन्नती ही प्रशिक्षीत पदवीधर शिक्षकांच्या सेवाजेष्ठतेनुसार राबविणे बाबत पदोन्नती कायदा पान २ वर

## सोशल मीडियावरील बदनामी मोहिमेला चाप लावण्यासाठी कायद्यात बदल करणार

मुंबई दि.१० (प्रतिनिधी):- सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर सध्या कोणत्याही पुराव्या शिवाय बदनामी करण्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. समाजातील सर्व घटकांना, विशेषत: महिलांना या प्रकारच्या बदनामीचा त्रास सहन करावा लागतो. याबाबतच्या कायदयात बदल करण्याची किंवा त्यात काही नवीन तरतूद करण्याची आवश्यकता आहे का याच्या पडताळणीसाठी राज्याच्या पोलीस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येईल या पान २ वर

श्री
स्वर्णिम वर्धापन वर्ष
50
हमारे प्रतिष्ठान त्रिंबकदास मिठ्ठूलाल झंवर
को ५० वर्ष पूर्ण होने के शुभ अवसर पर
हम अपने सभी सम्मानित ग्राहकों, मित्रों और शुभचिंतकों का
हृदय से आभार व्यक्त करते हैं।
पिछले ५० वर्षों से आपने जो विश्वास, प्रेम और सहयोग
हमारी दुकान को दिया है, वही हमारी सबसे बड़ी पूँजी है।
आपके निरंतर समर्थन और आशीर्वाद से ही हम
सेवा के इस सफर को सफलतापूर्वक आगे बढ़ा पाए हैं।
हम आशा करते हैं कि भविष्य में भी
आपका स्नेह और विश्वास इसी प्रकार बना रहेगा।
सादर धन्यवाद
-फर्म-
त्रिंबकदास मिठ्ठूलाल झंवर
चावल एवं गेहूं के ठोक विक्रेता
जुना मोंढा, बीड.
Mob.9423473736 9422940396

## बीडमधील गाडे कुटुंबाचा हृदयस्पर्शी निर्णय

# अपघातात दगावलेल्या लेकाचा जिवंतपणा जपला

## ब्रेन डेड मुलाच्या अवयवदानातून दुसऱ्याला जीवनदान

**बीड ( प्रतिनिधी ) जिल्ह्यातील एका दुर्दैवी अपघातानंतर घडलेल्या मानवी संवेदनांचा स्पर्श करणाऱ्या घटनेने अनेकांना भावूक केले आहे. दुचाकी अपघातात गंभीर जखमी झालेल्या तरुणाचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला. मात्र या दु:खद प्रसंगातही कुटुंबाने मोठ्या मनाने घेतलेल्या निर्णयामुळे एका गरजू रुग्णाला नवजीवन मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. या निर्णयामुळे गाडे कुटुंबाचे सर्वत्र कौतुक होत आहे.**

बीड जिल्ह्यातील राक्षसभुवन येथील संग्राम गाडे हा तरुण मित्रासोबत दुचाकीवरून पुण्याकडे जात असताना बारामतीजवळ त्यांचा अपघात झाला. या अपघातात संग्रामच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर त्याच्यावर पुण्यातील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू करण्यात आले. उपचारादरम्यान तरुणाचा मृत्यू त्याची प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी त्याला बीड जिल्हा पान २ वर



### अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तरळले

बीड जिल्हा रुग्णालयात आवश्यक वैद्यकीय प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर संग्रामचा मृतदेह पुढील प्रक्रियेसाठी छत्रपती संभाजीनगर येथे पाठवण्यात आला. तरुण मुलाच्या मृत्यूचे दु:ख मनात ठेवूनही गाडे कुटुंबाने घेतलेल्या या उदात्त निर्णयाने अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. या घटनेमुळे मानवतेचा खरा अर्थ पुन्हा एकदा अधोरेखित झाला असून समाजात अवयवदानाबाबत सकारात्मक संदेशही दिला गेला आहे.

CMYK

# परिवर्तन कोचिंग क्लासेस पाली येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न

पाली दि.१० (प्रतिनिधी):- परिवर्तन कोचिंग क्लासेस पाली तालुका जिल्हा बीड येथे, क्लासेसचे संचालक प्रा. शिंदे अशोक सर यांच्या संकल्पनेतून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या सत्काराचे मानकरी ''अक्षरगंगा प्रज्ञाशोध परीक्षा टॉपर्स विद्यार्थी नवले सोहम इ.७ वी तालुकास्तरीय प्रथम, राऊत किरण इ. ६ वी तालुकास्तरीय प्रथम, राऊत मानसी इ. ५ वी तालुकास्तरीय प्रथम, शिंदे यशराज इ. ४ थी तालुकास्तरीय प्रथम, जगताप राधिका इ. ३ री जिल्हास्तरीय पाचवी, राऊत वेदिका इ. २ री तालुकास्तरीय प्रथम, शिंदे देवश्री इ. २ जिल्हास्तरीय चौथी, शिंदे आरुषी इ.१ ली तालुकास्तरीय प्रथम, करडे सोहम इ.१ली जिल्हास्तरीय पाचवा



व शेख अरहान इ.१ली जिल्हास्तरीय तिसरा.'' एन. एम. एम. एस.पात्र विद्यार्थी (इ.८वी) येवले प्रणित, नवले शंभूराजे, नवले सोहम, कापले विजय, नवले अनुश्री, राऊत सिध्दी, कोलगुडे प्रगती व शिंदे सानिका. शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थी (इ.५वी) तेलप सक्षम, राऊत मानसी. दहावी बोर्डातील गुणवंत विद्यार्थी जगताप सागर - प्रथम, राऊत गीता - द्वितीय, बहिरवाळ स्वप्ना - तृतीय. तसेच क्लासेस मधील विविध क्षेत्रात निवड झालेली विद्यार्थी नवले तेजस्विनी MBBS, खराट शुभम चइइड, वीर संवाद BAMS, वीर रेवती, PROJECT ENGINEAR, औटे सुबोध BSF, औटे सौरभ CRPF, भंडारे राजकुमार BSF व खांडेकर पप्पू TA आर्मी. या विद्यार्थ्यांचा प्रमुख मान्यवर शिवाजी बंटेवाड- पोलीस - निरीक्षक स्थानीक गुन्हे शाखा बीड, प्रदीप चौरे केंद्रप्रमुख, मुरलीधर नवले, दीपक नवले माजी सरपंच, आनंद मस्के पोलीस, वडमारे साहेब पोलीस, गणेशभाऊ नवले, अनिल साळुंके यांच्या हस्ते सत्कार संपन्न झाला. तसेच ज्येष्ठ शिक्षण प्रेमी चंद्रसेन दादा नवले, लक्ष्मण दादा नवले, प्रवीण येवले, महेंद्र राऊत, राजेश वीर सर, नवले सिद्धेश्वर, वसंत साळुंके व राऊत मयुर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. याप्रसंगी श्री. बंटेवाड साहेब यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा बहुसंख्येने सत्कार होत आहे. त्याबद्दल अभिनंदन करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पडण्यासाठी परिवर्तन इंग्लिश स्कूलच्या प्राचार्य श्रद्धा मॅडम, स्वाती मॅडम, कोमल मॅडम आणि पूजा मॅडम यांचे मोलाचे सहकार्य लाभले. याप्रसंगी पालक, ग्रामस्थ, महिला आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## इराणच्या ३० तेल डेपोंवर हल्ला

नवी दिल्ली दि.१० :- इराण आणि इस्त्रायल यांच्यात सुरू असलेल्या युद्धाच्या आठव्या दिवशी पहिल्यांदाच अमेरिका आणि इस्त्रायल यांच्यात गंभीर मतभेद समोर आले आहेत. इस्त्रायलने शनिवारी एकाच दिवसात इराणच्या ३० इंधन डेपोंवर एकापाठोपाठ एक भीषण हल्ले केले. अमेरिकेच्या अधिका-याने दिलेल्या माहितीनुसार हे हल्ले इतके व्यापक असतील याची त्यांना कल्पना नव्हती. अमेरिकेने याला चुकीचा निर्णय असे म्हटले आहे. एक्सिओसच्या रिपोर्टनुसार, इस्त्रायली सैन्याने इंधन डेपोंवर हल्ला करण्यापूर्वी अमेरिकेला सूचना दिली होती, मात्र हल्ल्याची व्याप्ती अपेक्षेपेक्षा कितीतरी मोठी होती. अमेरिकेच्या एका अधिका-याने सांगितले की, हल्ल्याचा परिणाम इतक्या मोठ्या प्रमाणावर होईल हे पाहून त्यांना धक्का बसला आहे.

## सिंधी समाजाचे १२ एप्रिल रोजी पुणे येथे वर- वधू परिचय संमेलन -डॉ. जेसवानी

बीड दि.१० (प्रतिनिधी):- बी टी आडवाणी हॉल पिंपरी पुना येथे दि.१२ एप्रिल रोजी सिंधी समाजाचे भव्य वधू वर परिचय संमेलन होणार असून सुशिक्षित डिग्री व होल्डर्स नि संपर्क करावा. शेवटची तारीख ३१ मार्च २०२६असून कुमार मोटवानी मो ९८२३०१६४२५, जवाहर कोटवानी मो ९८२२५६२००५, श्रीचंद नागरानी मो ९८२२३२२६८१८, सांत्वन कौर पंजवानी- मो ९८५०५२०९२१,मनोहर जेसवानी मो ९८२२२८३१३४, डॉ. जेसवानी मो ९८९०४६०७०० ,९४२२२४०५९३ वर संपर्क करावा.

## युद्धाचा नाशिकमधील १२०० उद्योगांना फटका

मुंबई दि.१० (प्रतिनिधी):- इराण अमेरिका, इस्त्राईल युद्धाची झळ आता जगभरात बसताना दिसत आहे. आखाती देशांमध्ये सुरु असलेल्या या संघर्षामुळे तेलाचा तुटवडा जाणवू लागला आहे. भारतातही पेट्रोल, डिझेल महागण्याची चिन्हे दिसत आहेत. अशातच आता या युद्धामुळे नाशिकच्या अंबड व सातपूर एमआयडीसी येथील अनेक उद्योग बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. गॅस पुरवठ्याअभावी येथील १२०० उद्योगांना फटका बसण्याची शक्यता आहे.

पान १ वरून

### पुढाऱ्यांनो, रेल्वेचं काम पूर्ण करायचंय...

स्वत: जाऊन तिथल्या लोकांच्या अडचणी जाणून घेणे आणि त्या सोडविण्याचा प्रयत्न करत रेल्वे मार्गाचे काम सुरु करायला लावणे महत्वाचे आहे. परंतु तसे काहीच होत नाही. रेल्वेचा प्रश्न जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी विसरले की काय ? असेच झाले आहे. खरं तर वडवणी आणि परळीचा विचार केल्यास तेथील कामाला गती देण्यासाठी माजलगाव मतदार संघाचे आ.प्रकाशदादा सोळंके आणि परळीचे आ.धनंजय मुंडे यांनी स्वत: यामध्ये लक्ष घातले पाहिजे. टीकाटीप्पणी, आरोप-प्रत्यारोप हे होतच असतात परंतु अशा प्रकारामुळे काम थांबले नाही पाहिजे या भूमिकेतून धनंजय मुंडेंनी स्वत: वडवणी ते परळी पर्यंतचा रेल्वेचा प्रश्न हाती घ्यायला हवा. त्यांनी स्वत: लक्ष घातले तरच बीड ते परळीपर्यंत रेल्वे लवकरच धावतांना दिसेल.

### बीडच्या स्टेडियमवर कचऱ्याचे साम्राज्य...

प्रॅक्टीस करणाऱ्या खो खो खेळाडुंना होत आहे. तसेच समोरच्या बाजुला जे स्टीलचे गेट लावले आहे ते जमिनीपासून दोन फुट उंच आहे, त्याच्या खालून कुत्रे व इतर प्राणी सहज ग्राऊंडमध्ये फिरत असतात. मोठ्या प्रमाणात कुत्र्यांचा संचार शल्टर हाऊस प्रमाणे या ग्राऊंडवर असतो यामुळे लहान लहान मुले खेळतात, त्यांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. याकडे क्रीडा अधिकाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

### अवैध वाळू वाहतुकीसाठी हप्तेखोरी...

प्रदीप सुरवसे, अंबादास पुरी, गणेश म्हेत्रे यांनी केली. दरम्यान अवैध वाळू वाहतुकीला संरक्षण देणाऱ्या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यावरच लाच घेतल्या प्रकरणी कारवाई झाल्याने खळबळ उडाली आहे.

### अपघातात दगावलेल्या लेकाचा जिवंतपणा...

रुग्णालयात हलविण्यात आले. डॉक्टरांनी संग्रामवर अथक प्रयत्न करून उपचार केले. मात्र त्याच्या प्रकृतीत सुधारणा न झाल्याने अखेर उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे गाडे कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला. संग्रामचे वडील रमेश गाडे हे चहा विक्री करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. मुलाच्या अकाली मृत्यूने संपूर्ण कुटुंब हादरून गेले होते. मात्र या दु:खाच्या प्रसंगातही त्यांनी मानवतेचे मोठे उदाहरण घालून दिले. डॉक्टरांनी संग्राम ब्रेन डेड झाल्याचे सांगितल्यानंतर त्याच्या वडिलांनी आणि कुटुंबीयांनी अवयवदानाचा निर्णय घेतला. ''माझा मुलगा गेला, पण त्याचे अवयव दुसऱ्या कुणाला तरी जीवन देतील, यापेक्षा मोठं समाधान नाही,'' असे भावनिक शब्द संग्रामच्या वडिलांनी व्यक्त केले.

### स्थायी समितीची परवानगी न घेताच...

एखाद्या दुसऱ्या बँकेत खाते उघडून रक्कम वर्ग करायची असेल यासाठी स्थायी समितीत ठराव घेऊन परवानगी घ्यावी लागते. स्थायी समितीच्या परवानगीशिवाय अशा रकमा वर्ग करता येत नाही. खाजगी बँकांवाले आपल्या बँकेत मोठा निधी मोठी रक्कम यावी यासाठी संबंधीत लोकांशी चक्क व्यवहार करतात असे बोलले जाते. अचानकच कोटक महिंद्रा बँकेमध्ये निधी वर्ग करण्याचे कारण काय ? असा प्रश्न उपस्थित होत आहे. नगर पालिकेच्या विद्यमान पदाधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

### आश्वासनानंतर शिक्षकांचे उपोषण स्थगित

आणि त्या अनुषंगाने वेळोवेळा निघालेले शासन निर्णय आहेत, त्या प्रमाणेच पदोन्नती प्रक्रिया राबविले जाते. त्या प्रमाणे बीड जिल्हयातील प्रशिक्षीत पदवीधर शिक्षकांची सेवा जेष्ठता यादी जिल्हा परिषद बीड यांनी प्रसिध्द केली होती. सदर पदोन्नती प्रक्रिया सुरु असतांना TET परीक्षेचा निकाल लागला. या परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या काही शिक्षकांनी मंत्रालयीन स्तरावर विशेष प्रयत्न करुन दि.१९/०१/२०२६ रोजी शालेय शिक्षण मंत्रालयाचे एक परिपत्रक काढून फक्त TET उत्तीर्ण व्यक्तीनांच पदोन्नती दयावी असे मा. सुप्रिम कोर्टाने दि.०१/०९/२०२५ च्या एका प्रकरणाच्या न्याय निवाडयाच्या संदर्भान्वये हे परिपत्रक जारी करण्यात आले. या परिपत्रकान्वये पदोन्नती केल्यास पदोन्नती कायद्याचा भंग होत आहे सर्व पदोन्नती शासन निर्णयाच्या निकषाचे उल्लंघन होत आहे. सुप्रिम कोर्टाच्या न्याय निवाडयाच्या विरुध्द देशातील राज्यशासनानी आणि अनेक देशपातळीवरील शिक्षक संघटनानी ४० ते ५० रिव्हयू पिटीशन दाखल केलेल्या आहेत. राज्यसभा, लोकसभा, विधान सभा, विधान परिषद येथे या निर्णयाचा पुर्नविचार करावा. या विषयी अनेक सन्मानीय सदस्यांनी लक्ष वेधी लावून सभागृहात अधिवेसनात प्रश्न उपस्थित केले आहेत. राज्य शासनाने केंद्र शासनाकडे मार्गदर्शन मागविलेले आहे. त्यांचे मार्गदर्शन येण्याच्या अगोदरच किंवा रिव्हयु पिटिशनचा निर्णय येण्याच्या अगोदरचे पदोन्नती प्रक्रिया राबविली जात आहे. या बाबत संपूर्ण देशात गोंधळ निर्माण झालेला आहे. देशात मोठया प्रमाणात शिक्षकांचे धरणे, आंदोलने, मोर्चे निघत आहेत

देशातील कोणत्याही राज्यशासनाने या निर्णयाची अंमलबजावणी केलेली नाही. परंतू महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने घाईगडबडीत ग्रामविकास विभागास विचारात न घेता परिपत्रक काढून पदोन्नतीचा गोंधळ निर्माण करुन दिला आहे या परिपत्रकाप्रमाणे पदोन्नती प्रक्रिया राबविल्यास सेवाजेष्ठ शिक्षकांना डावलून कनिष्ठ शिक्षकांना पदोन्नती दिली जात आहे. यामुळे २५ ते ३० वर्षे सेवा केलेल्या सेवाजेष्ठ शिक्षकांवर अन्याय होत आहे

या निर्णयाची अमलबजावणी महाराष्ट्रातील एकही जिल्हा येवढ्या तातडीने करत नाही परंतू बीड जिल्हा परिषद TET उत्तीर्ण झालेल्या शिक्षकांसाठी येवढया घाईगडबडीत काही शिक्षकांच्या आग्राहाखातर सेवाजेष्ठता डावलून केंद्रप्रमुख पदोन्नती देण्याचा घाट घातलेला आहे. CTET परीक्षेचा निकाल अद्याप आलेला नाही. वास्तविक TET परीक्षा आणि CTET परीक्षा हया समकक्ष आहेत. एकाच परीक्षेच्या निकालावर पदोन्नती केल्यास CTET परीक्षेत सेवाजेष्ठ शिक्षक उत्तीर्ण झाल्यास ते पदोन्नती पासून वंचित राहतील. त्यांच्यावर अन्याय होईल. केंद्रशासनाचे या बाबत काही धोरणात्मक निर्णय येईपर्यंत किंवा CTET परीक्षेचा निकाल येईपर्यंत सदर पदोन्नती प्रक्रिया राबविण्यात येऊ नये. या न्याय मागणीसाठी बीड जिल्हयातील प्रशिक्षीत पदवीधर शिक्षक संघटनानी आमरण उपोषण सुरु केले होते.

सदर उपोषण सोडविण्यासाठी गेवराई मतदार संघाचे लोकप्रिय आमदार मा. विजयसिंह राजे पंडीत यांच्या मध्यस्थीने मा. उपनगराध्यक्ष विनोदजी मुळुक यांच्या सहकार्याने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शिक्षणाधिकारी यांच्या बरोबर सर्व संघटना प्रतिनिधी यांचे समवेत सविस्तर चर्चा करुन मध्यस्थीची भुमीका त्यांनी प्रभावीपणे पारपाडली. पदोन्नती प्रक्रिया घाईगडबडीत करु नका कोणत्याही सेवाजेष्ठ शिक्षकांवर अन्याय होता कामा नये असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सांगितले.

प्रसार माध्यमांच्या दणक्यामुळे प्रक्रियेवर आलेल्या शिक्षकांच्या आक्षेपावर आम्ही सुनावणी घेत आहोत. जे कोणी नियम बाहय असतील त्या शिक्षकावर प्रशासकीय कारवाई करण्यात येणार आहे. सदर आक्षेपावर सुनावणी घेण्यासाठी बराच कालावधी लागणार आहे दरम्यानच्या कालावधीत CTET परीक्षेचा निकाल आल्यास TET उत्तीर्ण शिक्षक आणि CTET उत्तीर्ण शिक्षक यांची एकत्रीत अंतिम सेवाजेष्ठता यादी प्रसिध्द करण्यात येईल व या शैक्षणिक वर्षात पदोन्नती प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. सदर प्रक्रिया पारपाडण्यासाठी कोणतीही घाईगडबड केली जाणार नाही असे आश्वासन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी व मा.शिक्षणाधिकारी यांनी दिल्याने तुर्त आमरण उपोषण मागे घेण्यात येत आहे. या प्रसंगी जिल्हयातील अनेक शिक्षक संघटनांनी व राजकीय, सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या लोकप्रतिनिधींनी उपोषणाला पाठींबा देऊन शिक्षकांवरील होणारा अन्याय दूर करण्यासाठी शिक्षकांचे मनोबल वाढविले. तसेच सर्व प्रसार माध्यमांनी या न्याय मागणीला आपल्या दैनिकातून जाहीर प्रसिध्दी दिली. त्यामुळे या सर्वांचे शिक्षक संघटनेमार्फत आभार व्यक्त करण्यात आले.

### जि.प.च्या पंचायत विभागाचे विस्तार अधिकारी शाहीर निलंबीत

करण्याबाबत ताकीद देण्यात आली होती. जिल्हा परिषद अधिनियम नुसार कर्तव्यात कसूर करणे आणि वरिष्ठाचे आदेश पालन न केल्यामुळे विस्तार अधिकारी शाहीर यांना निलंबित करण्यात आले आहे. सदर कारवाई पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी किशोर काळे यांच्या शिफारशीनुसार करण्यात आली आहे. सदरील निलंबनाच्या आदेशामुळे कामचुकार विस्तार विस्ताराधिकाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

### सोशल मीडियावरील बदनामी मोहिमेला चाप

समितीच्या शिफारशीनुसार पुढचा निर्णय घेण्यात येईल अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली.

याबाबत तारांकित प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. त्याला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. विधासभाध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी यावेळी आधी माहिती तंत्रज्ञान कायदयात बदनामीच्या गुन्हयासंदर्भात अटकेची तरतूद होती पण ती काढण्यात आली. ही तरतूद पुन्हा करता येईल का हे तपासावे असे म्हटले. त्यावर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आधी माहिती तंत्रज्ञान कायद्यासोबत भारतीय दंड संहिता किंवा आता बीएनएसची कलमेही लावता येत होती. पण सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर त्यात बदल झाला. त्यामुळे या कायदयाची परिणामकारकता कमी झाली. आता महासंचालकांच्या समितीला या मुद्यावरही विचार करण्यास सांगता येईल असेही ते म्हणाले.

### आता महिनाभरात होणार जमीन मोजणी..

उभय सभागृहात दिली. यामुळे मोजणीची प्रक्रिया आता केवळ १५ ते ३० दिवसांत पूर्ण होणार आहे.

राज्यात सध्या पोट-हिस्सा, हद्दकायम, बिनशेती आणि गुंठेवारीसारख्या मोजणी प्रकरणांचा निपटारा मनुष्यबळाअभावी रखडला होता. यावर उपाय म्हणून शासनाने २०० परवानाधारक भूमापकांना दोन खासगी अभिकरणांमार्फत कार्यारंभ आदेश दिले आहेत. हे भूमापक दोन आठवड्यांचे विशेष प्रशिक्षण पूर्ण करून कामावर रुजू होतील. अडीच एकरपेक्षा कमी जमीन असलेल्या अल्पभूधारकांसाठी मोजणी शुल्काबाबत शासन वेगळा आणि सहानुभूतीपूर्वक विचार करेल, असे आश्वासन बावनकुळे यांनी जयंत पाटील यांच्या प्रश्नावरील उत्तरात दिले.

राज्यातील ज्या १७-१८ तालुक्यांमध्ये मोजणीची प्रकरणे सर्वाधिक प्रलंबित आहेत, तिथे पायलट प्रोजेक्ट राबवण्यात येणार आहे. प्रत्येक महसूल विभागातील ३ तालुके याप्रमाणे एकूण १८ तालुक्यांची निवड करण्यात आली आहे. येथे खाजगी भूमापक आणि शासकीय अधिकारी यांची संयुक्त टीम काम करेल. मोजणीचे नकाशे, पंचनामे आणि अक्षांश-रेखांश (जीआयएस) तपशील थेट प्रणालीवर अपलोड होतील. मोजणीचे प्रमाणीकरण उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयामार्फतच होईल. कामात दोष आढळल्यास खाजगी भूमापकावर दंडात्मक आणि शिस्तभंगाची कारवाई करण्याची तरतूद कायद्यात करण्यात आली आहे. शासकीय जमिनींवरील अतिक्रमण, एकत्रीकरण किंवा पुनर्मोजणीचे काम मात्र खासगी भूमापकांना करता येणार नाही.

जिल्हा स्तरावर समित्या

खरेदीपूर्वीची मोजणी, सहमतीने पोट-हिस्सा आणि पाणंद रस्ते मोजणीची कामे वेगाने व्हावीत, यासाठी जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली जाणार आहे. या निर्णयामुळे शासकीय यंत्रणेवरील ताण कमी होऊन सर्वसामान्यांचे जमिनीचे वाद लवकर सुटण्यास मदत होईल, असा विश्वास महसूल मंत्र्यांनी व्यक्त केला.

पान ६ वरून

### खालापुरी येथे सर्वच शिक्षकांची अनुपस्थिती

अनुपस्थित होते. त्या शिक्षकावर कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. दरम्यान शिक्षणाधिकारी डॉ. किरण कुंवर यांनी दि. १० मार्च रोजी शिरूर तालुक्यातील तीन शाळेला भेटी दिल्या. मंगळवारी सकाळी ८.३० वाजता जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खालापुरी येथे भेट दिली असता शाळेतील सर्व शिक्षक अनुपस्थित होते. खालापुरी प्राथमिक शाळेचे प्रभारी अशोक सानप, सतीश म्हेत्रे, गोकुळ बुधनर, जगदीश ननवरे, श्रीमती पद्मिन बडे, मंदा तकीक किक बबन तांबे, हे सर्वच शिक्षक गैरहजर होते. शिक्षणाधिकारी डॉ. कुंवर यांनी परिपाठ घेऊन शाळा भरविली. सकाळी १०.३० वाजेपर्यंत त्यांनी या शाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता तपासली. त्यानंतर त्यांनी शिरूर तालुक्यातील अन्य दोन शाळेने भेटी दिल्या या ठिकाणीही अनियमित्ता असल्याचे दिसून आले आहे मात्र याबाबत अधिक माहिती मिळू शकली नाही.

### आई-वडील रागावल्यामुळे मुलाची आत्महत्या

आणि एक बहीण असा परिवार आहे. धामणगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करण्यात आले असून कडा पोलीस चौकीचे पोलीस हवालदार भाऊसाहेब आहेर पोलीस हवालदार नवले, पोलीस नाईक भुतेकर, पोलीस शिपाई पवळ, चालक पवार सह सहकाऱ्यांनी घटनेचा पंचनामा केला आहे.

### पोलीसास मारहाण व शासकीय कामात

जखम केली. सदर वेळी माननीय जिल्हाधिकारी साहेब यांच्या दिलेल्या निर्देशाचे उल्लंघन सुद्धा आरोपींनी केले व सरकारी कामात अडथळा निर्माण केला अशी फिर्याद दाखल केली, सदर फिर्यादीवरून आरोपी नितीन आत्माराम जोगदंड व विनोद रामनाथ शिंदे राहणार जुनी नागझरी तालुका गेवराई जिल्हा बीड यांच्याविरुद्ध गेवराई पोलीस स्टेशन येथे कलम ३५३, ३३२, ५०४, ५०६, ३४, १८८, २६९, २७० भा. द. वि. आणि कलम ३/१८१,१२८/१८१ मोटर वाहन कायदा तसेच कलम ५१ (ब) आपत्ती व्यवस्थापन कायदा प्रमाणे गुन्हा दाखल झाला. संबंधित पोलिसांनी तपास करून आरोपी विरुद्ध माननीय सत्र न्यायाधीश बीड यांच्या न्यायालयात वरील कलमानुसार दोषारोपपत्र दाखल केले. सदर सदर प्रकरणात फिर्यादी पक्षातर्फे आरोपीचा गुन्हा सिद्ध करण्यासाठी पाच साक्षीदार तपासण्यात आले, परंतु कोणत्याही सरकारी पक्षाची साक्ष आरोपी विरुद्ध गुन्हा सिद्ध करू शकली नाही व आरोपीचे वकील ॲड. सचिन अ.आबुज यांनी घेतलेला बचाव व सबळ पुराव्या अभावी माननीय सत्र न्यायाधीश आर. एम. नेरलीकर साहेब, बीड यांनी दोन्ही आरोपी यांना सदर प्रकरणातून दिनांक १० मार्च २०२६ रोजी निर्दोष मुक्त केले. सदर प्रकरणातील आरोपी मार्फत बीड येथील ॲड. सचिन अंबादासराव आबुज यांनी काम पाहिले, त्यांना ॲड. पूजा जाधव व ईशान रासकर यांनी सहकार्य केले.

### वाढत्या उन्हाने पिंपळनेरकर हैराण

झोप उडाली आहे. या वाढत्या उष्णतेचा सर्वाधिक फटका ज्येष्ठ नागरिक आणि लहान बालकांना बसत आहे.उन्हापासून बचाव करण्यासाठी नागरिक विविध उपाययोजना करताना दिसत आहेत. टोपी, गॉगल, छत्री, स्कार्फ यांचा वापर वाढला आहे. तसेच, दुपारच्या कडक उन्हात बाहेर पडणे टाळले जात आहे. शेतकरीवर्गही उन्हाच्या तीव्रतेचा सामना करीत आहे. शेतातील पिके कोमेजू नयेत, यासाठी पिकांना वारंवार पाणी दिले जाते.सकाळच्या गार वातावरणातच शेतातील कामे उरकून घेण्यावर भर दिला जात आहे. पुढील पंधरा दिवसांत गहू व हरभरा पिकांची काढणी-मळणी पूर्ण होण्याची शक्यता आहे.एप्रिल आणि मे महिन्यात उन्हाची तीव्रता आणखी वाढण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. त्यामुळे आगामी काळात उष्णतेपासून बचावासाठी अधिक खबरदारी घेण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांच्या परीक्षा संपल्यानंतर सुट्यांचे दिवस सुरू होणार असून, गावाजवळील विहिरी, कालवे आणि तलाव परिसरात पोहण्यासाठी मुलांची गर्दी वाढणार आहे. वाढत्या उन्हामुळे पिंपळनेरकरांना येत्या दोन महिन्यांत उकाड्याचा सामना करावा लागणार आहे.

### सावित्रीमाईंच्या संघर्षाची जिवंत कहाणी; मेघना झुंझम यांच्या एकपात्री प्रयोगाने

शिक्षणाचे महत्त्व यांचा जागर या प्रयोगातून करण्यात आला. सावित्रीमाईंच्या कार्याची आठवण करून देत समाजात परिवर्तनाची प्रेरणा देणारा हा प्रयोग उपस्थितांसाठी अविस्मरणीय ठरला.यावेळी महिला दिनानिमित्त आयोजित 'खेळ पैठणी'च्या होम मिनिस्टर स्पर्धेत महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवित कार्यक्रमाचा मनमुराद आस्वाद घेतला.

स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे : प्रथम - सुमित्रा संकेत गायकवाड (आकर्षक पैठणी व फ्रिज, सन्मानचिन्ह), द्वितीय - ऋतुजा लोंढे (आकर्षक पैठणी व वॉशिंग मशीन, सन्मानचिन्ह), तृतीय - मनीषा शेळके (आकर्षक पैठणी व ओव्हन, सन्मानचिन्ह), उत्तेजनार्थ - संगीता हराळ (आकर्षक पैठणी व राईस कुकर, सन्मानचिन्ह), पाचवा - योगिता रेडेकर (इंडक्शन शेगडी, सन्मानचिन्ह), सहावा - रेश्मा शास्त्री (टेबल फॅन, सन्मानचिन्ह), सातवा - इलेक्ट्रिक ब्लेंडर (सन्मानचिन्ह), आठवा - संगीता साबळे (केतली, सन्मानचिन्ह), नववा - ज्योती प्रविण पोकळे (इस्त्री, सन्मानचिन्ह), दहावा - जया वारंगुळे (टिफिन बॉक्स, सन्मानचिन्ह) देऊन विजेत्या महिलांना सन्मानीत करण्यात आले. यावेळी आष्टी तालुका दूध संघ,आष्टी नगरपंचायत कार्यालय,कासारी, मुर्शदपुर, शिंदेवाडी ग्रामपंचायत पदाधिकारी,पत्रकार, महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### आरटीईच्या प्रवेशामधील १ कि.मी.ची जाचक अट रद्द

वंचित घटकांतील मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न होत आहे सदरचा निर्णय अवैध आणि संविधानविरोधी असल्याची बाब निवेदनात नमूद केली होती. याची दखल घेत विधानपरिषद सदस्य आमदार एकनाथ खडसे व अनेक आमदारांनी आवाज उठवला होता व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांना धारेवर धरले होते त्यांच्या या सातत्यपूर्ण मागणीला मोठे यश आले असून अखेर आरटीई प्रवेशाची अंतराची जाचक अट रद्द करावी लागली आहे. आता पालकांना आपल्या मुलांनासाठी आवडती शाळा निवडता येईल तरी बीड जिल्ह्यातील वंचित दुर्बल घटकातील पालकांनी मुदतवाढ आल्यास आपल्या मुलांना आवडत्या शाळेत प्रवेश घेण्यासाठी सतर्क राहावे असे आवाहन समाजसेवक जे.डी.शाह यांनी ऐका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

पत्रात पुढे म्हटले आहे की उदाहरणार्थ, बीड शहराची भौगोलिक परिस्थिती आणि विस्तार पाहता, येथील बहुतांश नामांकित शाळा जसे की, ज्ञानेश्वर पब्लिक स्कूल, गुरुकुल शाळा , पोद्दार इंटरनॅशनल स्कूल, भगवान इंग्लिश स्कूल,मोईल स्कूल या शहराच्या एका टोकाला किंवा मुख्य वस्तीपासून दूर अंतरावर स्थित आहेत. बीड शहरासह जिल्ह्यात अनेक शाळा एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंतचे शाळांचे अंतर साधारणपणे ५ ते ६ किलोमीटर आहे. अशा परिस्थितीत केवळ १ किमी अंतराची अट सक्तीची केल्यामुळे, शहराच्या मध्यवर्ती किंवा जुन्या शहरात

राहणाऱ्या पालकांना आरटीई पोर्टलवर या प्रमुख शाळांचे पर्याय निवडणे अशक्य झाले होते. हीच वस्तुस्थिती आमदार एकनाथ खडसे व अनेक आमदारांनी जे.डी.शाह यांच्या लेखी निवेदनाची दखल घेत चालू अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या सभागृहात सरकारसमोर मांडली होती. विशेष म्हणजे आ.एकनाथ खडसे यांचा सभागृहात आक्रमक पवित्रा पाहायला मिळाला कारण आ. खडसे यांनी सुरू असलेल्या अर्थसंकल्प अधिवेशनादरम्यान विधान परिषदेत सरकारला धारेवर धरले होते. त्यांनी शिक्षण मंत्री दादा भुसे यांना पत्र लिहून आणि सभागृहात चर्चा घडवून आणत ही अट तातडीने रद्द करण्याची आग्रही मागणी केली होती. अखेर आरटीई प्रवेशाची अंतराची मर्यादा अट रद्द करावी लागली आहे यामुळे जिल्ह्यातील हजारो वंचित दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. राज्य सरकारच्या मनमानी कारभार लगाम घालण्यासाठी आवाज उठवविल्यामुळे विधानपरिषद सदस्य आमदार एकनाथ खडसे व चर्चेत सहभाग घेऊन शासनाच्या मनमानी कारभार लगाम लावण्यासाठी प्रयत्न केला व राज्यातील बहुजन वंचितांना न्याय मिळवून दिला याबद्दल आमदार एकनाथ खडसेंसह सर्व आमदारांचे समाजसेवक जे.डी.शाह यांनी आभार मानले आहे.

### जगदीश सिकची यांचे निधन

आला यामध्ये दिनांक ९ मार्च रोजी सोमवारी रात्री चे वेळी त्यांचे निधन झाले. त्यांचा अंत्यविधी किल्ले धारुर शहरातील पोलीस स्टेशनच्या पाठीमागील स्मशानभूमीत १० मार्च रोजी सकाळी करण्यात आला . त्यांच्या निधनाने सर्वत्र दु:ख व्यक्त केले जात आहे त्यांचा मनमिळावू व प्रेमळ स्वभावा मुळे ते सर्व परीचीत होते. दोन वर्षा पुर्वी एस टी महामंडळातून ते सेवानिवृत्त झाले होते. त्यांचे पश्चात आई पत्नी दोन मुली मुलगा भाऊ असा परीवार आहे. सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी श्रीराम सिकची यांचे बंधु होते.

### परिचारिका अभावी प्रसूतीसाठी अनियमितता

अभावी नागरिकांना तालुक्याच्या गावी जाऊन खाजगी रुग्णालयात दाखल करावे लागत असून अनेक खर्चाला सामोरे जावे लागत आहे. तरी वरिष्ठांनी किट्टी आडगाव प्राथमिक केंद्राकडे लक्ष द्यावे, असे आवाहन परिसरातील गावकऱ्यांच्या वतीने करण्यात येत आहे.

रुग्णालया प्रसूतीसाठी आलेल्या महिलांची प्रसूती डॉक्टरांच्या संपर्कात राहून परिचारिका करतात,तर केंद्र आणि राज्यशासनाने अनेक अशा महिलांच्या आरोग्यासाठी योजना आणलेल्या आहेत. प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व असेल, जननी शिशु सुरक्षा, प्रधानमंत्री, मातृवंदन अशा विविध योजना राज्यशासनाने प्राथमिक आरोग्य केंद्राचे उपक्रम राबवले आहेत. त्यामुळे माता मृत्यू दर कमी झाल्याचं यश नाकारता येणार नाही. एखाद्या बाईला रुग्णालयाच्या आवारामध्ये प्रसूती करावी लागते, जेव्हा ग्रामीण भागामध्ये जोखमीच्या गर्भधारणेमध्ये त्या ठिकाणी तज्ज्ञ डॉक्टर, अनुभवी परिचारिका यांच्या जागा रिक्त असतात, तेव्हा जाणवतं योजना आहेत, पण लोकांपर्यंत पोहोचत नाहीत. योजना सक्षम आहे, निधी उपलब्ध आहे, रचना उभी आहे, पण शेवटच्या टप्प्यावर जर ती मिळत नसेल तर त्याचा उपयोग काय ? असा प्रश्न उभा राहतो तेव्हा जिल्हा परिषद आरोग्य प्रशासनाने यासंदर्भात लक्ष घालण्याची मागणी होत आहे.

### नगर रोडवर रिटायर फौजीचा राडा

सिलेंडरही रस्त्यावर पडल्याने काही काळ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. यामुळे मात्र चहाच्या गाड्यांचे मोठे नुकसान झाल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, या घटनेचा व्हिडिओ काही नागरिकांनी आपल्या मोबाईलमध्ये कैद केला असून तो सोशल मीडियावरही व्हायरल होत आहे. या प्रकाराबाबत शिवाजीनगर पोलीस अकलूज पुढील कारवाई होणार का ?, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### माजलगावच्या नवीन आणि जुन्या बसस्थानकात

करण्याचे आदेश दिले त्यामुळे माजलगाव येथे १३ सप्टेंबर २०२५ रोजी या बस स्थानकाची इमारत पाडण्यास सुरुवात करण्यात आली होती, त्यानंतर महिनाभरात संपूर्ण बसस्थानक भुईसपाट करण्यात आले. या ठिकाणी अलीकडील बाजूला तात्पुरते स्थानक पत्र्याच्या शेडमध्ये सुरू करण्यात आले. त्या ठिकाणाहून बसेस सोडण्यात येतात. तेथे तात्पुरत्या बस स्थानकात प्रचंड धूळ आहे प्रत्येक बस आली की प्रचंड धूळ उडून ती प्रवाशांच्या नाकात तोंडात जात आहे.या बस स्थानकातून दररोज ये जा करणाऱ्या प्रवाशांना या दररोज तोंडा नाकात जाणाऱ्या धुळीमुळे दमा , श्वास घ्यायला त्रास होण्यासह विविध आजारांना आमंत्रण मिळु लागले आहे. या ठिकाणी एखादा प्रवासी अर्धा तास थांबल्यास पूर्णपणे चेहऱ्यावर धुळीचा थर दिसून येतो. एवढ्या मोठ्या प्रमाणात धूळ उडत असताना येथील आगार प्रमुखांना याचे काहीच देणे घेणे नसल्याचे दिसून येत आहे.या ठिकाणी प्रवाशांना बसण्यासाठी उभारण्यात आलेल्या शेडमध्ये केवळ ३०-४० प्रवासी बसू शकतात. छोटा सेड केल्यामुळे व या छोट्या शेडमध्ये दुपारी एक वाजल्यापासून ऊन येऊ लागल्याने या ठिकाणी प्रवाशांना बसणे मुश्किल होते.अपु-या असलेल्या शेडमध्ये उभा राहता येत नसल्याने त्यांना भर तळपत्या उन्हात बसेसची वाट पाहत व नाकातोंडात धूळ जात असली तरी ते सहन करत उभे राहावे लागण्याची कसरत करावी लागत आहे. या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची देखील कुठलीही सोय नाही किंवा सोयीचा असा निवारा देखील प्रवाशांना नाही. त्यामुळे प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत.

### स्त्रियांनी आत्मसन्मान जपत कुटुंबाची काळजी घ्यावी

संचलित श्री सिद्धेश्वर महाविद्यालय व महिला तक्रार निवारण समिती व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून त्या बोलत होत्या.

अध्यक्षस्थानी सुरेंद्र रेदासणी तसेच मंचावर मुख्याधिकारी सुंदर बोंदर, अभय कोकड, एकनाथ जाधव, प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, डॉ. प्रेमनंदा घडसिंग, डॉ.शिवशंकर मिटकरी, डॉ. ज्ञानेश्वर गवते, प्रा.अशोक होके. मीनाक्षी बामनकर उपस्थित होत्या.पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, महिला व मुलींची सुरक्षितता व नागरी स्वच्छता या घटकांना मी नगराध्यक्ष म्हणून प्राधान्य देईल. त्याचबरोबर महिलांनी स्वत: शिक्षित होऊन आपल्या परिवाराच्या सर्व सदस्यांना शिक्षित करावे. मुख्याधिकारी सुंदर बोंदर म्हणाले की, महाविद्यालयाचा हा उपक्रम अतिशय कौतुकास्पद आहे. समाजाच्या एका दुर्लक्षित घटकाकडे आपण या माध्यमातून लक्ष केंद्रित केले व आपण सफाई कर्मचाऱ्यांचा केलेल्या सत्कार पाहून या महिलांना अजून कार्य करण्याची प्रेरणा मिळेल. प्राचार्य मुकुंद देवर्षी म्हणाले की, महिलांच्या कर्तुत्वाचा सन्मान करणारी आपली भारतीय शिक्षण प्रसारक संस्था आहे. अध्यक्षीय भाषणात सुरेंद्र रेदासणी म्हणाले की, महाविद्यालयाच्या अशा अभिनव उपक्रमाचे कौतुकच आहे अशा उपक्रमाच्या माध्यमातून आपण सामान्य जनतेशी जोडलेले असणे गरजेचे आहे. प्रास्ताविक प्रा. सुवर्ण पांचाळ यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. प्रतिभा जाधव यांनी केले तर आभार डॉ. प्रेमनंदा घडसिंग यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व महिला कर्मचाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ.गजानन होन्ना, डॉ.युवराज मुळये, प्रा.अंकुश साबळे, पर्यवेक्षक परमेश्वर खेत्री, कार्यालय अधीक्षक श्री. उत्तरेश्वर आनेवार, प्रा.प्रीती कळसणे, प्रा.स्वाती साखरे, प्रा. पूजा मस्के, प्रा.पूजा सिंग, श्रीमती आशाताई कांबळे, पल्लवी आगे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक कर्मचारी यांची उपस्थिती होती.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

# पार्श्वभूमी

दिनांक ११ मार्च २०२६ पान -३

## धनादेश वठला नाही प्रकरणातून शरद माधवराव ढहाळे यांची निर्दोष मुक्तता

बीड दि १० (प्रतिनिधी) -फिर्यादी प्रभाकर भगवानराव काळे यांची आरोपी शरद माधवराव ढहाळे यांचे विरुध्द १३८ निगोशिएबल इन्स्ट्रंमेंट कायदयाखाली धनादेश आधारीत झाला म्हणून अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,बीड यांचे न्यायालयात प्रकरण दाखल केले,सदर प्रकरणात आरोपीचे वतीने ॲड.जितेंद्र पांडव यांनी केलेला युक्तीवाद ग्राहय धरुन अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी यांनी आरोपीची निर्दोष मुक्तता केली यात ॲड.बाळासाहेब बन्सी राऊत, ॲड. प्रबोध आपेगावकर यांनी सहकार्य केले.

## श्री गजानन महाराज मंदिर येथे उद्या संगीतमय भागवत कथेचे आयोजन

बीड दि १०(प्रतिनिधी)- एकनाथ नगर भक्ती कन्स्ट्रक्शन येथील गजानन महाराज मंदिरामध्ये हरिभक्त परायण बाळू महाराज नाव्हेकर यांच्या सुश्राव्य वाणीतून संगीतमय भागवत कथा प्रसंगी परमपूज्य यज्ञ मार्तंड श्री यज्ञेश्वरजी सेलूकर महाराज यांची सदिच्छा याबरोबरच दिनांक १२ गुरुवार रोजी दुपारी १२ वाजता महाप्रसाद आहे याचा लाभ भाविकांनी घ्यावा असे आवाहन श्री संत गजानन महाराज सेवा मंडळ एकनाथ नगर बीड यांच्या वतीने देशमुख यांनी केले आहे.

## प्रताप सरनाईक साहेब! शिवनेरी, शिवशाही नंतर 'राजमाता जिजाऊ बस' परंतु 'लालपरीची' दैना फिटणार तरी कधी?-डॉ. गणेश ढवळे यांचा सवाल

बीड दि.१०(प्रतिनिधी)राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी स्वराज्य संकल्पना प्रेरिका राजमाता जिजाऊ यांच्या स्मरणार्थ नव्या राजमाता जिजाऊ नावाच्या ३ बाय २ आसन रचनेच्या ५५ आसनी अत्याधुनिक बस खरेदी करण्याचे आदेश दिले आहेत.

एसटी महामंडळाने यापूर्वी शिवनेरी, शिवशाही, शिवाई, यशवंती, हिरकणी अशा विविध नावांनी बससेवा सुरू केल्या आहेत. मात्र ग्रामीण व शहरी भागातील सर्वसामान्य नागरिकांची जीवनवाहिनी असलेली 'लालपरी' आजही दुरावस्थेत असल्याचे चित्र संपूर्ण महाराष्ट्रात पाहायला मिळत आहे. तेव्हा प्रताप सरनाईक साहेब लाल परीची दयना कधी फिटणार? असा सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी प्रसिद्धी पत्रकातून केला आहे

अनेक ठिकाणी एसटी बसची अवस्था अतिशय खराब असून प्रवाशांना मोडकळीस आलेल्या व धोकादायक बसमधून प्रवास करावा लागत आहे. याकडे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी तातडीने लक्ष देण्याची गरज आहे असे नमूद करून पुढे म्हटले आहे की, सोमवार दि. ९ रोजी अंबेजोगाई ते छत्रपती संभाजीनगर प्रवास करताना एसटी बसमधील आसनव्यवस्था पूर्णपणे मोडकळीस आलेली दिसून आली. याबाबत बस कर्मचाऱ्यांना विचारणा केली असता ही अवस्था अनेक दिवसांपासून असल्याचे सांगण्यात आले.बीड जिल्ह्यात यापूर्वी २६ जुलै २०२५ रोजी एसटीच्या दुरावस्थेचे दर्शन घडवणाऱ्या तीन घटना एकाच दिवशी घडल्या होत्या. त्याचे व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले होते. पावसाळ्यात अनेक बस गळतात त्याचे पाणी थेट प्रवासाच्या अंगावर पडते बस मध्ये छत्री घेऊन बसण्याची वेळ आल्याचे देखील व्हिडिओ गाजले आहेत.नेकनूर ते मांजरसुंभा दरम्यान छत्रपती संभाजीनगर ते लातुर जाणाऱ्या (एमएच-२४ एयू ८३३५) बसचे चाक



निखळून पडले होते. बस नियंत्रणात आणल्याने मोठा अनर्थ टळला.या घटनांमुळे लालपरीमधून प्रवास करणे अनेक ठिकाणी धोकादायक ठरत असून नादुरुस्त बसची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे.

## अल्पवयीन मुलीला, छेडछाड व विनयभंग करून आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले; कोर्टाने ठोकली सहा महिन्याची शिक्षा

बीड दि १०(प्रतिनिधी)- अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून, छेडछाड व विनयभंग करून आत्महत्या करण्यास



प्रवृत्त केल्याचा गुना सिद्ध झाल्यावर गेवराई तालुक्यातील दिमाखवाडी येथील मनेश उर्फ बाळु गंगाधर जायगुडे यास दोषी ठरवत जिल्हा व सत्र न्यायाधीश १ व्यंकटेश एच. पाटवदकर यांच्या कोर्टाने महिने करावास व १ हजार रुपये दंड व दंड न भरल्यास १ महिना करावास अशी शिक्षा ठोठावली आहे. सदर प्रकरणात सहा सरकारी वकिल ॲड. अजय श्रीमंतराव तांदळे यांनी काम पाहिले.

यासंदर्भात यातील फिर्यादीने नमूद केले होते की, फिर्यादीची मुलगी ही बीड येथील शाळेमध्ये शिक्षणासाठी येणे जाणे करीत असताना गेली सहा महिन्यापासून मनीष उर्फ बाळू गंगाधर जायगुडे हा त्याचा पाठलाग करून तो मला खूप आवडतेस म्हणून छेडछाड करून तिचा विनयभंग करत गावात बदनामी केली या बदनामी पोटी व त्रासास कंटाळून २९ मार्च २०२२ रोजी सकाळी ८ ते ८:४५ च दरम्यान लोखंडी अँगल ला गळफास घेऊन तिने आत्महत्या केली. अशा आशयाच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन गेवराई येथे आरोपी विरूध्द कलम ३०५, ३५४, ३५४-ड भादवी आणि कलम १२ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंध्द कायदा सन २०१२ प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला. सदर फिर्यादीवरून तात्कालील उपविभागीय अधिकारी गेवराई स्पप्निल आर. राठोड यांनी या प्रकरणाचा तपास केला व जिल्हा व सत्र न्यायालय बीड येथे आरोपी विरूध्द दोषारोपपत्र दाखल केले.सदर प्रकरणी सुनावणी जिल्हा व सत्र न्यायाधीश - १ व्यंकटेश एच. पाटवदकर साहेब बीड यांच्या न्यायालयात झाली. सदर आरोपी विरूध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी सरकारी पक्षातर्फे एकुण ९ साक्षीदार तपासण्यात आले व सदर प्रकरणत पिडीता, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, वैद्यकीय अधिकारी, तपासी अधिकारी यांचा पुरावा व सहा सरकारी वकिल अजय श्रीमंतराव तांदळे यांचा युक्तीवाद ग्राहय धरून जिल्हा व सत्र न्यायाधीश -१ व्यंकटेश एच. पाटवदकर यांनी आरोपी यास कलम ३०५, ३५४, ३५४-ड भादवी आणि कलम १२ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंध्द कायदा सन २०१२ प्रमाणे ६ महिने साधा करावास व १ हजार रुपये दंड व दंड न भरल्यास १ महिना साधा करावास आशी शिक्षा ठोठावली आहे.

सदर प्रकरणात शासनाच्या वतीने सहा. सरकारी वकिल अजय श्रीमंतराव तांदळे यांनी काम पाहिले. या खटल्या उपविभागीय अधिकारी आष्टी गेवराई स्पप्निल आर. राठेड व कोर्ट पैरवी अधिकारी पोष्ट गव्हाणे, सपो पोलीस कॉन्स्टेबल श्रीमती. सविता चव्हाण यांनी सहकार्य केले.


## भगवान श्रीकृष्ण आश्रम केज येथे श्रीराम कथा व १०८ कुंडी महाविष्णु यज्ञाचा आज प्रारंभ

केज दि १०(प्रतिनिधी) -भगवान श्रीकृष्ण आश्रम केज येथे अकरा मार्चपासून सुरू होत असलेल्या श्रीराम कथा व १०८ कुंडी महाविष्णु यज्ञाची तयारी पूर्णत्वाला आली.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, अहमदपूर - अहिल्या नगर राष्ट्रीय महामार्गा लगत असलेल्या केज येथील भगवान श्रीकृष्ण आश्रम, परिसरात श्रीकृष्ण मंदिराच्या भव्य भूमिपूजन सोहळ्या निमित्त १०८ कुंडी भव्य महाविष्णु यज्ञयाग, व रामायणाचार्य ह.भ.प. रामराव ढोक महाराज नागपूर यांच्या संगीत रामकथा व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक कार्यक्रम बुधवार दि.११ मार्च ते गुरुवार दि. १९ मार्च या कालावधीत संपन्न होणार आहे. या महाविष्णु यज्ञ, राम कथा व किर्तन सोहळ्या साठी हिमाचल प्रदेश येथील महंत तपस्वी परमहंस श्री १००८ स्वामी चिन्मय पुरीजी महाराज यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. संगीत रामकथा रामायणाचार्य ह.भ.प. रामराव महाराज ढोक नागपूर यांच्या रसाळ वाणीतुन सादर होणार असून दररोज सकाळी ८ ते ११ वाजता महाविष्णु १०८ कुंडीयज्ञ दुपारी २ ते ५ संगीतमय तुलसी रामायण कथा, सायंकाळी धार्मिक विधी, रात्री ८ ते १० हरीकीर्तन व हरिजागराचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमात विविध संत-महात्म्यांची कीर्तन सेवा लाभणार असून भाविकांसाठी दररोजमहाप्रसाद व अन्नदानाची व्यवस्था करण्यात आली आहे. परिसरातील सर्व भाविकांनी व धर्मप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या पुण्यलाभाचा लाभ घ्यावा, असे आवाहन भागवत भुषण ह.भ.प.केशव महाराज शास्त्री व श्रीकृष्ण आश्रम परिवार यांच्या वतीने करण्यात आले आहे.यज्ञ मंडपाचे काम पुर्णत्वास आले असून राजस्थान येथील कारागीर हे दिड महिन्या पासून यज्ञ मंडप उभारणीचे काम करीत असून, हे काम अंतिम टप्प्यात आले आहे. या मंडपात १०८ यज्ञ कुंड तयार करण्यात आले असून त्यांना गोमूत्र, गोमय, मृतीका यांनी सारवण करुन रंगरंगोटी करण्यात येत आहे. श्रीराम कथा मंडपाचे काम पुर्णत्वास आले असून ५ हजार भाविकांची बसण्याची व्यवस्था होईल असा वॉटर प्रूफ मंडप उभारण्यात आला असून भोजन मंडपाचे कामही अंतिम टप्प्यात असल्याची माहिती भगवान श्री कृष्ण आश्रमाचे संस्थापक भागवत भुषण ह.भ.प. केशव महाराज शास्त्री यांनी प्रतिनिधीशी बोलताना दिली आहे.

## एसपी साहेब खाकी वर्दीतील नेकनूर ठाण्याच्या संबंधित दादा लोकांचा बंदोबस्त करावा- मोरे

बीड दि १०(प्रतिनिधी)- तालुक्यातील नेकनुर पोलीस स्टेशन जणू भ्रष्टाचाऱ्यांचा अड्डा बनल्यामुळे कार्यक्षेत्रातील सर्वसामान्य नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. नेकनुर पोलीस स्टेशनमधे गुन्हा नोंद करण्यासाठी फिर्यादीला तारेवरची कसरत करून पैसे मोजावे लागतात अनेक प्रकारच्या चोऱ्या, अल्पवयीन मुलींवरील अत्याचार, अवैध धंदे, महिलांवरील झालेले अन्याय हे सर्व अर्थपूर्ण व्यवहारातून राजरोस दडपून टाकण्याचे काम नेकनुर पोलीस ठाण्यातील काही पोलिसांनी वारंवार केले आहे. तेव्हा या पोलीस ठाण्यातील खाकी मधल्या दादा लोकांचा बंदोबस्त करावा अशी मागणी बाळासाहेब मोरे यांनी केली आहे.यासंदर्भात पोलीस अधीक्षक, महसूल मंडळ अधिकारी कार्यालय यांना निवेदन दिल्याचे नमूद करून मोरे यांनी नमूद केले की, नेकनुर पोलीस स्टेशनहद्दीत या अगोदरही अनेक वेळा पोलिस अधीक्षक कार्यालयाच्या पथकासह स्थानिक गुन्हे शाखेने धाडी टाकून कारवाया केल्या आहेत.



दिनांक 09/03/2026

प्रति,
मा.पोलिस अधिक्षक साहेब,
पोलिस अधिक्षक कार्यालय, बीड

विषय : नेकनुर पोलिस ठाण्यातील खाकी गणवेशातील भ्रष्टाचारी गुंडांचा बंदोबस्त करणे बाबत

परवा गेवराई पोलीस स्टेशनचे अधिकारी कर्मचारी नेकनुर येथे येऊन मोटारसायकल चोराचा अड्डा उद्धस्त करतात मात्र नेकनुर पोलिसांना मोटारसायकल चोर गेल्या अनेक वर्षांपासून सापडत नाहीत याचे परिसरातील जनतेला आश्चर्य वाटत आहे याबाबत काही कर्तव्यदक्ष पत्रकारांनी वेळोवेळी नेकनर पोलिसांच्या भ्रष्ट कारभार बद्दल वर्तमानपत्रांमधून आवाज उठवला. दरम्यान या ठाण्याचे प्रभारी अधिकारी आणि दोन आमदाराचे संबंध जोडले जात आहेत.तर कर्तव्यदक्ष पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांची दिशाभूल करण्यात चंद्रकांत गोसावी यशस्वी झाले आहेत . तेव्हा गोसावींनी पदाचा व खाकीचा दुरूपयोग करूनही त्यांचे निलंबन का होत नाही?. याचे कोडे उलगडले आहे. मोरे यांनी निवेदनात असाही आरोप केला आहे की चंद्रकांत गोसावी यांनी बालासाहेब ढाकणे, दत्तात्रय बळवंत, सचिन गर्जे, पुंडे, सचिन मुरूमकर, क्षीरसागर या पोलिस कर्मचाऱ्यांना वसुली प्रतिनिधी म्हणून नेमले असल्याचे सांगण्यात येते त्यामुळे भ्रष्ट्राचारी व खाकी वर्दीला काळीमा फासणाऱ्या संबंधित पोलिसांचे निलंबन करण्याच्या मागणीसह त्यांच्या संपूर्ण कार्यकाळाची व संपत्तीची चौकशी होईपर्यंत लोकशाही मार्गाने लढा दिला जाईल असा इशारा निवेदनातून दिला आहे.

## कुंदन ऋषीजी महाराज यांच्या स्वास्थ्याची विचारपूस



जामखेड दि १०(प्रतिनिधी)- पुणे शहरातील ज्येष्ठ समाजसेवक उद्योजक विजयकांत कोठारी यांनी आज अहिल्यानगर येथील महाराष्ट्र प्रवर्तक परमपूज्य कुंदन ऋषीजी महारासाब यांच्या स्वास्थ्यची विचारपूस करून आशीर्वाद घेतले आणि मांगलिक घेतली. यावेळी परमपूज्य अलोकऋषीजी महाराज यांचे दर्शन घेतले .यावेळी जामखेडचे महाराष्ट्र राष्ट्रवादी शरद पवार पार्टीचे जनरल सेक्रेटरी राजेंद्र कोठारी, पुणे येथील उद्योजक नितीन कोठारी, जैन कॉन्फरन्स चे राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य तथा सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी, मितेश अभय कोठारी माजी सरपंच सुनील कोठारी, आदी उपस्थित होते.

## रस्त्यावर खड्डा खोदला पण झाकण लावलेले नाही नगरपालिकेला अपघात घडवायचे आहेत काय?

बीड दि १० (प्रतिनिधी)- शहरातील व्यापारी संकुल कॉम्प्लेक्स च्या कमानीच्या जवळ नगरपरिषदेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांनी या ठिकाणी रस्त्याच्या मधोमध नाली दुरुस्तीचे नावाखाली आयताकृती खड्डा खोललेला आहे. परंतु त्यावर झाकण लावलेले नाही याला कित्येक दिवस लोटले तरी याकडे दुर्लक्ष केले आहे तेव्हा नगरपालिकेच्या संबंधित विभागाला या ठिकाणी गंभीर अपघात घडवायचा आहे काय असा सवाल दुचाकी स्वार व नागरिकांच्या वतीने श्याम मार्कंडे यांनी प्रसिद्धी पत्रकातून केली आहे.

दिवसा प्रत्येक वाहन चालकाला सदरील खड्डा दिसतो. परंतु रात्री खड्डा दिसत नसल्यामुळे आपाताची शक्यता नाकारता येत नाही. या ठिकाणी नगरपरिषदच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांनी वाहन चालकाच्या सुरक्षितेच्या दृष्टीने कसलाही सूचना बोर्ड लावलेला दिसून येत नाही. या परिसरात सर्व प्रकारचे दुकाने असल्याने परिसर सतत गजबजलेला असून दुचाकी वाहनाची मोठी वर्दळ असते. नगर परिषदेच्या संबंधित विभागाने सदर ठिकाणी नागरिकांनाच्या चालकाच्या सुरक्षितेच्या दृष्टीने त्वरित सिमेंटचा ढाचा या ठिकाणी लावून हा खड्डा रस्त्यासारखा सारखा पूर्वीप्रमाणे करावा ज्यामुळे वाहन चालक व सामान्य नागरिक या खड्ड्यात पडून जखमी होणार नाहीत. याची नगरपरिषदेच्या संबंधित विभागाने काळजी घ्यावी अशी मागणे नागरिकांनी केली आहे.

## गेवराई तालुक्यातील ग्रामपंचायतींनी दिव्यांग निधी तात्काळ खर्च करावा

सिरसदेवी दि १० (प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्य दिव्यांग धोरण २०१८ नुसार प्रत्येक ग्रामपंचायतीने आपल्या एकूण उत्पन्नाच्या ५% निधी हा दिव्यांगांच्या कल्याणासाठी खर्च करणे अनिवार्य आहे. मात्र, गेवराई तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतींमध्ये या निधीचे योग्य नियोजन झाले नसून तो लाभार्थ्यांपर्यंत पोहोचलेला नाही. या गंभीर विषयाकडे लक्ष वेधण्यासाठी 'छावा क्रांतिवीर सेना, महाराष्ट्र राज्य' संघटनेचे जिल्हा प्रमुख राहुल चाळक यांनी राज्याचे सामाजिक न्याय मंत्री व ग्रामविकास व पंचायत राज मंत्री यांना निवेदन पाठवून गेवराई तालुक्यातील ग्रामपंचायतीनी दिव्यांग निधी खर्च करावा अन्यथा संघटनेच्या वतीने आंदोलन केले जाईल असा इशारा दिला आहे.छावा क्रांतिवीर सेनेने आपल्या निवेदनात तालुक्यातील सर्व ग्रामसेवकांना आणि ग्रामविकास अधिकाऱ्यांना ५% निधी खर्च करण्याबाबत तात्काळ लेखी आदेश देण्यात यावेत.थकीत निधीचा वापर,ज्या ग्रामपंचायतींनी मागील वर्षाचा निधी खर्च केला नाही, तो चालू आर्थिक वर्षात दिव्यांगांच्या हितासाठी वापरण्यात यावा.दोषींवर कारवाई,जे अधिकारी किंवा ग्रामपंचायत जाणीवपूर्वक हा निधी देण्यास टाळाटाळ करत आहेत, त्यांच्यावर कडक प्रशासकीय कारवाई करण्यात यावी.व प्रत्येक ग्रामपंचायतीने किती निधी शिल्लक आहे आणि किती दिव्यांगांना लाभ दिला, याची माहिती पंचायत समितीच्या फलकावर किंवा सरकारी पोर्टलवर प्रसिद्ध करावी.तसेच अद्याप नोंदणी न झालेल्या दिव्यांगांची शासकीय दप्तरी नोंद करून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष मोहीम राबवावी. अन्यथा छावा क्रांतिवीर सेनेचे जिल्हा प्रमुख राहुल चाळक हे १७ मार्च २०२६ रोजी गेवराई पंचायत समिती कार्यालय येथे उपोषणास बसणार असल्याचा इशारा निवेदनातून दिला आहे .

## बारामती वैद्यकीय शासकीय महाविद्यालयाचे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर हेच नाव ठेवावे

बीड दि १०(प्रतिनिधी)- बारामती येथे वैद्यकीय शासकीय महाविद्यालयाला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव दिलेले आहे परंतु त्या नावाला खोडा घालण्याचा प्रयत्न चालू आहे. तरी बारामती येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सर्वोच्च रुग्णालय बारामती हेच नाव कायम ठेवावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते योगेश कुंभारकर यांनी केली आहे. यासंदर्भात प्रसिद्धीच दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य एका समाजापुरते किंवा एका राज्यापुरते नव्हे तर भारतभर समाज हिताचे काम त्यांनी त्यांच्या काळी केले आहे. त्यामुळे त्यांचं नाव बदलण्याचा कुणीही प्रयत्न करू नये नसता महाराष्ट्रातील धनगर समाजाबरोबरच इतर समाज सुद्धा रस्त्यावर येऊ शकतो. कारण पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ह्या एका समाजापूरते किंवा एका राज्यापुरते नव्हे तर सर्व हिताचे काम करत होत्या म्हणून त्यांना पुण्यश्लोक ही पदवी मिळाली आहे. ती आजवर कोणाला सुद्धा मिळाली नाही. त्यामुळे बारामती येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सर्वोपचार रुग्णालय बारामती, हेच नाव कायम ठेवावे सामाजिक कार्यकर्ते योगेश कुंभारकर

## सुभाष रोड बनला 'पार्किंग पॉईंट'

### रस्त्याच्या मधोमध वाहनांमुळे वाहतूक कोंडी करणारावर कारवाई कधी?



बीड दि १० (प्रतिनिधी)- शहरातील मुख्य बाजारपेठ म्हणून ओळखला जाणारा सुभाष रोड सध्या अक्षरशः पार्किंग पॉईंट बनल्याचे चित्र दिसत आहे. या रस्त्याच्या मधोमध चारचाकी वाहने उभी केल्यामुळे दिवसभर वाहतूक कोंडी निर्माण होत असून अपघाताचा धोका देखील वाढला आहे. तेव्हा अशा रस्त्याच्या मधोमध पार्किंग झालेल्या वाहनावर कारवाई कधी असा सवाल नागरिकांमधून केला जाऊ लागला आहे.

सुभाष रोडवर मोठ्या प्रमाणात व्यापारी आस्थापने असल्याने खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांची व वाहनांची वर्दळ कायम असते. मात्र या परिसरात पुरेशी पार्किंग व्यवस्था नसल्याने अनेक वाहनचालक आपली चारचाकी वाहने थेट रस्त्याच्या मधोमध उभी करत आहेत. त्यामुळे रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनांना मार्ग काढणे कठीण होत असून वाहतुकीचा वेग मंदावतो.एकीकडे बीड येथील शासकीय रुग्णालय परिसरात रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या दुचाकींवर वाहतूक पोलिसांकडून ऑनलाईन दंडाची कारवाई केली जाते, तर दुसरीकडे सुभाष रोड, बार्शी रोड व नगर रोडवर रस्त्यावरच उभ्या असलेल्या चारचाकी वाहनांकडे मात्र दुर्लक्ष केले जात असल्यास आरोप नागरिक करीत आहेत.तसेच रस्त्यावर बेकायदेशीरपणे वाहने उभी करणाऱ्यांवर कडक कारवाई करून दंड आकारला तरच वाहनचालक वाहतूक नियमांचे पालन करतील, असेही नागरिकांचे मत आहे.

### त्यांचा होतो व्यापार पण मानसिक त्रास नागरिकांना

रस्त्याच्या बाजूला कोणत्याही इमारतीमध्ये दुकाने किंवा व्यवसाय थाटले जाणार असतील तर दुकानात येणाऱ्या प्रवाशांच्या वाहनासाठी पार्किंगला जागा सोडावी लागते परंतु सुभाष रोडवर येथून तेथून कुठेही इमारत मालकांनी पार्किंगला जागा ठेवलेली नाही अशा इमारतीमध्ये मोठ-मोठी दुकाने थाटली आहेत त्यांच्या दुकानात चार चाकीत बसून खरेदीसाठी येणारे ग्राहक आणलेली गाडी रस्त्याच्या मधोमध उभी करतात. हा एक प्रकारे आपल्या व्यवसायासाठी सार्वजनिक रस्त्याचा वापर म्हणता येईल. आपल्या व्यापारासाठी रस्त्याच्या मधोमध ग्राहकांच्या गाड्या उभ्या करून नागरिकांना नाहक त्रास दिला जातो यासंदर्भात कठोर पावले उचलली गेली पाहिजेत असेही नागरिकांचे मत आले.

## पोलीस व महसूल कर्मचाऱ्यांच्या संगनमताने गोदाकाठ परिसरात अवैध वाळू उपसा; अजय सरवदे यांची तक्रार

बीड दि १० (प्रतिनिधी)-गेवराई व माजलगाव तालुक्यातील गोदाकाठ परिसरात मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या अवैध वाळू उपसा व वाहतुकीमागे पोलिस व महसूल प्रशासनातील काही अधिकारी-कर्मचाऱ्यांचे संगनमत असल्याचा गंभीर आरोप पुढे आला आहे. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे बीड पश्चिमचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी केली आहे. यासंदर्भात पोलीस महानिरीक्षक छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी बीड आणि पोलीस अधीक्षक बीड यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की

गेवराई तालुक्यातील गंगावाडी, बोरगाव, गोपत पिंपळगाव, श्रीपत अंतरवाला, तपे निमगाव (गोदाकाठ परिसर) तसेच माजलगाव तालुक्यातील रिधोरी, शेलगाव, काळेगाव या भागांमध्ये रात्री-दिवस मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा आणि वाहतूक सुरू आहे. स्थानिक पातळीवर मिळालेल्या माहितीनुसार या प्रकरणात पोलिस व महसूल विभागातील काही अधिकारी-कर्मचारी आर्थिक फायद्यासाठी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याची चर्चा सुरू आहे.या संदर्भात गेवराई व माजलगाव उपविभागातील काही पोलीस कर्मचारी, अधिकारी तसेच स्थानिक गुन्हे शाखेतील काही कर्मचाऱ्यांची नावेही वारंवार पुढे येत असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. त्यांच्या संगनमतामुळे गोदाकाठ परिसरात मोठ्या प्रमाणावर वाळू उपसा आणि वाहतूक सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच तपे निमगाव, रिधोरी, शेलगाव, काळेगाव आणि श्रीपत अंतरवाला परिसरात काही शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात अवैध वाळूचा साठा करून ठेवला असल्याचा उल्लेखही करण्यात आला आहे.

या प्रकरणाची उच्चस्तरीय आणि निष्पक्ष चौकशी करून संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांचे मोबाईल सीडीआर ( कॉल डिटेल रेकॉर्ड ) व तांत्रिक माहिती तपासावी, तसेच संगनमत आढळल्यास तात्काळ निलंबन व विभागीय चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय गोदाकाठ परिसरातील अवैध वाळू साठा जप्त करून संबंधितांवर गुन्हे दाखल करावेत, तसेच जिल्ह्यात लागू असलेल्या महाराष्ट्र वाळू उत्खनन धोरणाचे पालन होते का याचीही चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.तरया प्रकरणात तातडीने कारवाई न झाल्यास पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर किंवा गोदावरी नदी पात्रात लोकशाही मार्गाने उपोषण आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# संपादकीय

## युद्धात AI चा वापर करण्यास ट्रम्पना रोखले!

एकविसाव्या शतकात तंत्रज्ञान हे केवळ प्रगतीचे साधन राहिले नसून ते सत्तेच्या संघर्षाचे मुख्य रणांगण बनले आहे. खासकरून अमेरिकेत जे द्वंद उभे राहिले आहे ते काळजीत टाकणारेच आहे. 'अँथ्रोपिक' ही अमेरिकेतील आघाडीची एआय कंपनी. याच कंपनीची सेवा अमेरिकन संरक्षण मंत्रालय (पेंटागॉन) वापरते. मात्र, पेंटागॉन आणि अँथ्रोपिक यांच्यात जोरदार खटके उडले आहेत. त्यामुळे अभूतपूर्व संघर्ष पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे, तो केवळ एका करारापुरता मर्यादित नाही, तर तो मानवी मूल्ये आणि युद्धातील तांत्रिक वर्चस्व यांच्यातील आहे. 'न्यूयॉर्क टाइम्स'ने प्रसिद्ध केलेल्या वृत्तानुसार, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अँथ्रोपिकच्या तंत्रज्ञानाचा वापर तातडीने थांबवण्याचे आदेश दिले आहेत, ज्यामुळे सिलिकॉन व्हॅली आणि वॉशिंग्टन यांच्यातील दरी आता स्पष्टपणे निदर्शनास आली. अँथ्रोपिक ही कंपनी तिच्या 'क्लॉड' या एआय मॉडेलसाठी ओळखली जाते. क्लॉड हे मॉडेल टेक्स्ट समजून घेते, प्रश्नांना उत्तर देते, माहिती संश्लेषित करते आणि कित्येक गोष्टींमध्ये मानवी सहाय्य करते. ते चॅटजीपीटीसारखेच आहे, पण काही बाबतीत वेगळ्या नियमांखाली बनवलेलं आहे. एआय म्हणजे कॉम्प्युटर प्रोग्राम ज्याला स्वतः विचार करण्याचे किंवा निर्णय घेण्याचे लहान-मोठे सामर्थ्य असते, पण हे मानवी बुद्धिमत्तेपेक्षा पूर्णपणे स्वतंत्र नाही. आजही एआयचे निर्णय मानवी काळजी, नियम आणि जबाबदारीखाली ठेवले जातात. कंपनी सुरुवातीपासूनच 'सेफ्टी-फर्स्ट' (सुरक्षिततेला प्राधान्य) या भूमिकेवर ठाम आहे. वादाची ठिणगी तेव्हा पडली जेव्हा पेंटागॉनने अँथ्रोपिककडे त्यांच्या तंत्रज्ञानाचा 'सर्व कायदेशीर कारणांसाठी' विनाअट वापर करण्याची मागणी केली. यामध्ये प्रामुख्याने दोन गोष्टींचा समावेश होता : पूर्णपणे स्वायत्त लष्करी शस्त्रे (-ींपेंाी थशरेपी) आणि अमेरिकन नागरिकांवर मोठ्या प्रमाणावर पाळत ठेवणे (चरीी डीीशळश्र-श्ररपलश). अँथ्रोपिकने क्लॉडचा वापर सुरुवातीला काही लष्करी कामांसाठी केला होता आणि तो पेंटागॉनच्या अनेक कामांमध्ये मदत करत होता. युद्धात माहिती पाहणे, विश्लेषण करणे, सिम्युलेशन करणे आणि निर्णय-सहाय्य यासारखी कामे एआय खूप वेगाने करू शकते. पण नंतर, जेव्हा पेंटागॉनने अँथ्रोपिकला आग्रह केला की, एआयला अधिक स्वातंत्र्याने युद्धातील निर्णयांसाठी वापरू द्या, कोणतेही बंधन न ठेवता, तेव्हा मोठा वाद सुरू झाला. घरगुती नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर डेटा वापरून त्यांची माहिती गोळा करण्याने नागरिकांच्या हक्कांवर प्रश्न उठू शकतो, असे कंपनीचे म्हणणे आहे. अँथ्रोपिकचे मुख्य कार्यकारी अधिकारी डारियो अमोदेई यांनी या अटी मान्य करण्यास स्पष्ट नकार दिला. त्यांच्या मते, एआय प्रणाली अजूनही इतकी विश्वासार्ह झालेली नाही की तिने मानवी हस्तक्षेपाशिवाय कोणाचा जीव घ्यावा की नाही, याचा निर्णय घ्यावा. तसेच, आम्ही देशाच्या संरक्षणासाठी तंत्रज्ञान देण्यास तयार आहोत, पण मानवी मूल्ये गहाण ठेवून नाही, असे अमोदेई यांनी ठासून सांगितले आहे. एआयचा वापर संरक्षणात्मक कामांसाठी किंवा डेटा विश्लेषणासाठी करण्यास त्यांची हरकत नाही, परंतु स्वायत्त शस्त्र प्रणाली विकसित करण्यासाठी हे तंत्रज्ञान देणे त्यांच्या नैतिक मूल्यांच्या विरोधात आहे. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी या प्रकरणाला राजकीय वळण दिले आहे. त्यांनी अँथ्रोपिकला 'लेफ्टविंग नट जॉब्स' (डाव्या विचारसरणीचे वेडे) असे संबोधून त्यांच्यावर अमेरिकेच्या सुरक्षेशी खेळ करीत असल्याचा आरोप केला आहे. तसेच राष्ट्राध्यक्ष ट्रम्प आणि संरक्षण विभागाने अँथ्रोपिकच्या या भूमिकेला 'राष्ट्रीय सुरक्षेत अडथळा' असल्याचे म्हटले आहे. पेंटागॉनच्या मते, जर अमेरिकन कंपन्यांनी हे तंत्रज्ञान लष्कराला दिले नाही, तर चीन आणि रशिया या शर्यतीत पुढे निघून जातील. ट्रम्प यांच्या आदेशानुसार, अँथ्रोपिकला पुरवठा साखळीसाठी धोका (सप्लाय चेन रिस्क) म्हणून घोषित करण्यात आले आहे. हे लेबल सामान्यतः केवळ शत्रू राष्ट्रांतील कंपन्यांना दिले जाते. पेंटागॉनने म्हटलं की, आम्हाला सर्व कायदेशीर वापरासाठी एआयची मुभा हवी आहे. याचा अर्थ असा की, संवेदनशील असलं तरीही सरकार एआयचा वापर बिनबोभाट करू शकेल. युद्ध आणि सुरक्षा क्षेत्रात एआयची पूर्ण क्षमता मिळवणे आवश्यक आहे आणि त्याला कंपनीने मर्यादा लावू नयेत. पेंटागॉनच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, ते स्वयंचलित हत्या करणारे शस्त्रे बनवण्याची किंवा नागरिकांना नजर ठेवण्याची इच्छा ठेवत नाहीत, पण एआयचा वापर 'सर्व कायदेशीर कामे' करण्यासाठी हवा आहे. पेंटागॉनचे प्रवक्ते सीन पार्नेल यांनी इशारा दिला की, कोणतीही खासगी कंपनी लष्कराला युद्ध कसे लढावे हे शिकवू शकत नाही. प्रशासनाने अँथ्रोपिकला सहा महिन्यांचा अवधी दिला असून, या काळात त्यांनी लष्करी मागण्या मान्य न केल्यास त्यांच्यावर गंभीर दिवाणी आणि फौजदारी कारवाई करण्याची धमकीही दिली आहे. अँथ्रोपिकने नकार दिल्यानंतर काही तासांतच 'ओपन-एआय' या प्रतिस्पर्धी कंपनीने पेंटागॉनशी हातमिळवणी केली. ओपन एआयचे प्रमुख सॅम ऑल्टमन यांनी जाहीर केले की, त्यांची कंपनी वर्गीकृत लष्करी नेटवर्कवर एआय पुरवण्यासाठी तयार आहे. जरी आपण सुरक्षा नियमांचे पालन करू असे ऑल्टमन यांनी म्हटले असले, तरी ज्या वेगाने हा करार झाला, त्यावरून असा प्रश्न उपस्थित होतो की, एआय कंपन्यांमध्ये बाजारपेठेतील वर्चस्वासाठी नैतिकतेशी तडजोड करण्याची स्पर्धा सुरू झाली आहे का? हा वाद अशा वेळी समोर आला आहे जेव्हा अमेरिकेने इराणमधील हल्ल्यात आणि व्हेनेझुएलातील कारवाईत 'क्लॉड'चा वापर केल्याचे वृत्त 'वॉल स्ट्रीट जर्नल'ने दिले आहे. जरी अँथ्रोपिकने हे नाकारले असले, तरी युद्धभूमीवर एआयची उपयुक्तता सिद्ध झाली आहे. पण प्रश्न हा आहे की, जर एआयने चुकीचा निर्णय घेतला आणि त्यात निष्पाप नागरिक मारले गेले, तर त्याची जबाबदारी कोणाची? पेंटागॉनचे म्हणणे आहे, की एआयमुळे युद्धात अचूकता येईल आणि सैनिकांचे प्राण वाचतील. मात्र, तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत आहे, की 'हॅलुसिनेशन' (एआयने चुकीची माहिती खरी मानणे) ही एआयमधील मोठी त्रुटी आहे. युद्धाच्या मैदानात अशी छोटी चूकही मोठ्या नरसंहाराला कारणीभूत ठरू शकते. जर एखाद्या एआय प्रणालीने चुकीचा निर्णय घेतला, तर त्याची जबाबदारी कोणाची? अँथ्रोपिकने घेतलेली भूमिका सरकारी दबावापुढे ती किती काळ टिकेल, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. हा संघर्ष दर्शवतो की येणाऱ्या काळात युद्धे केवळ शस्त्रांनी नाही, तर कोडिंग आणि अल्गोरिदमच्या जोरावर लढली जातील, जिथे नैतिकता आणि सामर्थ्य यांचा मोठा संघर्ष पाहायला मिळेल. हा वाद फक्त एका कंपनी आणि सरकारचा नाही तर तो भविष्याच्या एआय आधारित युद्ध, राष्ट्रीय सुरक्षा आणि मानवी निर्णयांच्या सीमांवर एक मोठी परीक्षा आहे. अँथ्रोपिक म्हणते की, तंत्रज्ञान अद्याप इतकं विश्वासार्ह नाही की ते युद्धातील जीवन-मृत्यू निर्णय घेऊ शकतं आणि तंत्रज्ञान हक्कांचे उल्लंघन करू नये. पेंटागॉन म्हणतो की, राष्ट्राची सुरक्षा सर्वात महत्त्वाची आहे आणि एआयला ज्यामध्ये वापर आवश्यक ते सर्व कायदेशीर कामांमध्ये वापरणं हवं. यातून पुढे येणारे परिणाम आणि निर्णय एआय आणि मानवतेच्या भविष्यात एक मोठा ठसा उमटवतील. अँथ्रोपिक आणि पेंटागॉनमधील हा संघर्ष येणाऱ्या अनेक वर्षांपर्यंत चर्चेत राहील. हे केवळ एका सॉफ्टवेअरबद्दल नाही, तर मानवी भविष्याच्या नियंत्रणाबद्दल आहे. जर तंत्रज्ञान कंपन्यांनी लष्कराच्या प्रत्येक मागणीला होकार दिला, तर आपण एका अशा जगाकडे जाऊ जिथे मशीन माणसांचे नशीब ठरवतील आणि जर कंपन्यांनी अडवणूक केली, तर राष्ट्रीय सुरक्षेचे काय? आज अँथ्रोपिक एकाकी पडल्यासारखी वाटत असली, तरी त्यांनी घेतलेली नैतिक भूमिका भविष्यात एआय एथिक्ससाठी एक मैलाचा दगड ठरू शकते. लोकशाही देशांनी तंत्रज्ञान आणि लष्करी सामर्थ्य यांच्यात संतुलन राखण्याची गरज आहे, अन्यथा आपण तयार केलेले तंत्रज्ञानच आपल्या विनाशाचे कारण ठरेल.

# महिलांना शिक्षण, सुरक्षितता आणि समान संधी मिळाली पाहिजे - सौ. पुजा कुलकर्णी

अंबाजोगाई दि.१०(प्रतिनिधी)- महिलांना शिक्षण, सुरक्षितता आणि समान संधी मिळणे अत्यंत आवश्यक आहे. प्रत्येक वर्षी ८ मार्च रोजी साजरा होणारा जागतिक महिला दिन हा महिलांच्या हक्कांची जाणीव करून देणारा महत्त्वाचा दिवस असल्याचे प्रतिपादन सौ पूजा राम कुलकर्णी यांनी अध्यक्षपदावरून बोलताना केले.

अखिल भारतीय पेशवा संघटना बीड जिल्हा अंबाजोगाई शाखेच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. पुढे त्या म्हणाल्या की, आजच्या काळात महिला शिक्षण, व्यवसाय, विज्ञान, तंत्रज्ञान, राजकारण आणि क्रीडा अशा विविध क्षेत्रांमध्ये आपले कौशल्य सिद्ध करत आहेत. तरीदेखील अनेक ठिकाणी महिलांना असमानता, अन्याय आणि हिंसाचाराचा सामना करावा लागतो. त्यामुळे महिलांना योग्य शिक्षण, सुरक्षित वातावरण आणि समान संधी मिळणे गरजेचे आहे. महिला सशक्तीकरण म्हणजे त्यांना स्वतंत्रपणे निर्णय



घेण्याची संधी देणे होय. महिला सक्षम झाल्या तर संपूर्ण समाज प्रगतीच्या दिशेने वाटचाल करतो. स्त्रियांना मान-सन्मान देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे, असेही त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. सौ. गौरी कुलकर्णी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. यानंतर सौ. उज्वला कुलकर्णी आणि सौ. रजनी देशपांडे यांनी गणेश स्तवन सादर केले. यावेळी अखिल भारतीय पेशवा संघटनेच्या पदाधिकारी श्रीमती अंजली चौधरी यांनी सौ. पूजा राम कुलकर्णी व उद्घाटक डॉ. सौ. गौरी कौस्तुभ कुलकर्णी यांचा शाल, पुष्पहार व सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक अखिल भारतीय पेशवा संघटनेचे कार्याध्यक्ष सुधीर धर्माधिकारी यांनी संघटनेच्या वतीने वर्षभरात राबविण्यात आलेल्या विविध सामाजिक उपक्रमांचा आढावा सादर केला.जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सौ. कल्याणी राहुल देशपांडे, सौ. शैला शैलेश रूईकर, सौ. मनीषा विवेक वालेकर, सौ. प्रतिभा गणेशअष्टपुत्रे, तसेच श्रीमती कल्पना संतोष मुळावकर यांचा शाल, पुष्पहार व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.यावेळी सौ. शैलेश रूईकर, सौ. मनीषा विवेक वालेकर आणि तिलोत्तमा पतकराव, व संघटनेच्या शहर अध्यक्ष सौ.उज्वला कुलकर्णी यांनी प्रभावी मनोगत व्यक्त करून आपल्या भावना व्यक्त केल्या.कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन अखिल भारतीय पेशवा संघटनेच्या महिला जिल्हाध्यक्ष सौ. अंजली लक्ष्मीकांत देशपांडे यांनी केले. तर संघटनेचे उपाध्यक्ष डॉ. दिलीप कुलकर्णी यांनी आभार प्रदर्शन केले.

# माजलगावात सराफ सुवर्णकार असोसिएशनचा मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन

## पोलीस अधिकारी यांचा कर्तव्यदक्षता आणि जनसेवा गौरव सोहळ्याला उपस्थित राहावे: रांजवण, सातपुते, बोकन यांचे आवाहन

माजलगाव दि१०(प्रतिनिधी) सराफ सुवर्णकार समाजातील व्यापारी व कारागिरांना कायदेशीर मार्गदर्शन मिळावे तसेच कर्तव्यदक्ष पोलीस अधिकाऱ्यांचा गौरव व्हावा या उद्देशाने सराफ सुवर्णकार असोसिएशन, माजलगाव यांच्या वतीने IPC 411 / BNS 317 संदर्भात भव्य मार्गदर्शन मेळावा व कर्तव्यदक्षता आणि जनसेवा गौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

हा कार्यक्रम शुक्रवार, दि. १३ मार्च २०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता शाहू नगर, माजलगाव येथील वैष्णवी मंगल कार्यालयात संपन्न होणार आहे. या कार्यक्रमात पोलीस अधीक्षक नवनित कांवत व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड तसेच त्यांच्या संपूर्ण पथकाचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. तसेच माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांच्यासह पोलीस दलातील अधिकारी उपस्थित



राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजलगावचे आमदार प्रकाश (दादा) सोळंके राहणार असून प्रमुख मार्गदर्शक म्हणून राजेशजी रोकडे (चेअरमन - ऑल इंडिया जेम अँड ज्वेलरी डोमेस्टिक कौन्सिल), तर यावेळी प्रमुख उपस्थितीत माजी आ.राधाकृष्ण आण्णा होके, आ. विजयसिंह पंडित, ओमप्रकाश शेटे, मोहनराव जगताप, बाबुराव पोटभरे, उपनगराध्यक्ष सहाल चाऊस, ग्रामीण पोलीस निरीक्षक बालक कोळी, शिवाजी रांजणव उमेश मोगरेकर तुकाराम येवले कल्याण आबुज पांडुरंग उगले प्रभाकर कुलथे यांच्यासह जिल्ह्यातील विविध व्यापारी संघटना व सुवर्णकार संघटनांचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

तसेच सचिन अंबिलवादे, गणेश बेद्रे (सुवर्णकार फेडरेशन), माधव निर्मळ (उद्योजक, बीड), मंगेश लोळगे, आनंत दादा रुद्रवार, संतोष शेठ सोहनी आदी मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. व कायदे सल्लागार अँड .दिपक देशमुख यांचे कायदेशीर मार्गदर्शन होणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन सराफ सुवर्णकार असोसिएशन माजलगावचे अध्यक्ष रामराजे रांजवण, सचिव गजानन बोकन, उपाध्यक्ष नारायण सातपुते यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले आहे. समस्त सराफ सुवर्णकार बांधवांनी या मार्गदर्शन मेळाव्यास उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. कार्यक्रमानंतर सर्वांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले आहे.

# संयुक्त राष्ट्रसंघ हतबल झालाय का?

सध्याची जागतिक परिस्थिती पाहता असा प्रश्न प्रत्येकाच्या मनात येऊ लागलेला आहे की, संयुक्त राष्ट्र संघ हतबल झालाय का? असा प्रश्न पडल्या शिवाय राहत नाही.दुसऱ्या महायुद्धामध्ये अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा आणि नागासाकी या दोन शहरावर अणुबॉम्ब टाकला आणि जपान बेचिराक केला तिथून पुढे युद्ध थांबले आता जगाला शांती हवी होती युद्ध नको होते आणि याच पार्श्वभूमीवर २४ ऑक्टोबर १९४५ ला संयुक्त राष्ट्र संघाची स्थापना झाली संयुक्त राष्ट्र संघाचे उद्देश फार व्यापक आणि उदात्त आहे ते म्हणजे राष्ट्र राष्ट्रातील प्रश्न युद्धाच्या मार्गाने नव्हे तर परस्पर विचारातून सोडवणे, जगामध्ये शांती निर्माण करणे, आंतरराष्ट्रीय सामंजस्य व सहकार्य वाढवणे, मानवी हक्काचे संरक्षण आणि संवर्धन करणे यासारखे अनेक उद्देश घेऊन संयुक्त राष्ट्र संघ स्थापन झाला आज या जागतिक संस्थेमध्ये १९५ पैकी १९३ राष्ट्र सदस्य आहेत परंतु मागील काही वर्षातील जागतिक परिस्थितीचा अभ्यास केला तर संयुक्त राष्ट्र संघ हातबल झाल्यासारखं दिसत आहे. त्यामध्ये रशिया युक्रेन युद्ध, सर्व महासत्ता मध्ये निर्माण झालेला अहंकार, अफगाणिस्तान आणि पाकिस्तान मधील संघर्ष, अमेरिकेने व्हेनेझुएला वर केलेले हल्ले, हमास आणि इस्रायल युद्ध आणि आज अमेरिका इजराइल व इराण युद्ध या युद्धाने रक्ताचे पाठ वाहू लागले आहेत पूर्ण आखाती देश बेचिराक होत आहेत जगामध्ये दारू गोळ्याच्या कोठाराला आग लागली आहे जग तिसऱ्या महायुद्धाच्या वेशीवर आले आहे आणि असे असताना संयुक्त राष्ट्र संघ उघड्या डोळ्याने हे पाहत आहे. न्यूयॉर्क येथील वातानुकूलित इमारतीत बसून फक्त निषेध व कागदी घोडे नाचविण्याशिवाय संयुक्त राष्ट्रसंघ काहीही करू शकत नाही हे संयुक्त राष्ट्रांचे अपयश म्हणायचे का? का संयुक्त राष्ट्र संघ महासत्ता पुढे हातबल झालाय? असे एक ना अनेक प्रश्न जगातील प्रत्येक माणसाच्या मनात निर्माण झाले आहेत. असे इतिहासाचे एक छोटे अभ्यासक



-प्रा.तात्यासाहेब डोईफोडे

# शिक्षणासोबतच संस्कार देणारे श्री समर्थ इंग्लिश स्कूल-फपाळ

माजलगाव दि १० (प्रतिनिधी)- शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना चांगले संस्कार देणारी शाळा म्हणून श्री समर्थ इंग्लिश स्कूल अल्पावधीतच आपली वेगळी ओळख निर्माण करत आहे. या शाळेतील शिक्षक विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याबरोबरच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करत आहेत. त्यामुळेच कमी कालावधीत शाळेने नावलौकिक मिळवला आहे, असे प्रतिपादन शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन रमेश फपाळ यांनी केले. माजलगाव तालुक्यातील उमरी येथील श्री समर्थ इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन सोमवार दि. ७ रोजी रात्री ७ वा. मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उमरी जिल्हा परिषद केंद्राचे केंद्रप्रमुख विठ्ठल आरबे, विजया अर्बन बँकेचे व्हाइस







चेअरमन आसाराम घायतिडक, श्री समर्थ इंग्लिश स्कूलचे संचालक ज्ञानेश्वर घायतिडक तसेच पत्रकार वैजनाथ घायतिडक उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. लहानग्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले नृत्य, देशभक्तीपर गीत, नाटिका आणि सामाजिक संदेश देणारे कार्यक्रम यांना उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.कार्यक्रमादरम्यान शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच विविध स्पर्धांमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश कोरडे, वर्षा चोले,प्रमेश्वर कांबळे,राधा घायतिडक, ज्ञानेश्वरी सुर्वे,पुजा गिरी,लक्ष्मी करे कर्मचारी व पालकांनी विशेष परिश्रम घेतले.या सर्व कार्यक्रम चे सुत्रसंचलन शाळेतील लहान मुलांनी केले.तर आभार ज्ञानेश्वरी सुरवसे यांनी मानले.

# बहुजन विकास मोर्चाचा कार्यकर्ता मेळाव्यात केला जाणार चार बौद्ध नगरसेवकांचा सन्मान

माजलगाव दि १० (प्रतिनिधी)- बहुजन विकास मोर्चाच्या वतीने १५ मार्च रोजी गुडलक लॉन्स ग्रामीण पोलीस स्टेशन जवळ माजलगाव येथे चार बौद्ध नगरसेवकांचा सन्मान होणार असून याला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबूराव पोटभरे यांचे अत्यंत मोलाचे मार्गदर्शन होणार असून या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्रीहरी मोरे ( उपसभापती ) हे राहणार आहेत. यावेळी माजलगाव शहरात नुकत्याच पार पडलेल्या नगर परिषद निवडणुकीत शहरातील चार बौद्ध समाजातील विविध प्रभागातून निवडून आलेल्या नगरसेवकांचा जाहीर सत्कार व सन्मान करण्यात येणार आहे तर येत्या भिमजन्मोत्सव व इतर विविध महत्वाच्या विषयांवर ब. व. म. चे संस्थापक अध्यक्ष बाबूराव पोटभरे हे सर्व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. तरी या कार्यकर्ता संवाद मेळाव्यास जास्तीत जास्त कार्यकर्त्यांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहाण्याचे आव्हान माजलगाव नगर परिषद माजी बांधकाम सभापती तथा बहजन विकास मोर्चाचे जेष्ठ नेते राजेश साळवे, बाबा शेख, राजरतन डोंगरे यांनी केले आहे. या कार्यक्रमास आवर्जुथन नवनाथ धाईजे, विठ्ठल पंडीत, प्रदीप पटेकर, सचिन डोंगरे, बाबासाहेब वाघमारे, वसंत वाव्हळकर, मुरली साळवे सर, प्रकाश कोकाटे आदींची उपस्थिती असणार आहे. तरी सर्व कार्यकर्त्यांनी या मेळाव्यास मोठ्या संख्येनेउपस्थित राहावे असे आवाहन केले

# क्रांतीज्योतींना डॉ.आंबेडकर विद्यालयामध्ये अभिवादन



बीड दि १० (प्रतिनिधी): येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये भारतीय आद्य शिक्षिका समाजक्रांतिकारक, क्रांतीज्योती सावित्रीबाईफुले यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रम मुख्याध्यापक हावळे बी.ए. यांच्या मुख्य उपस्थितीमध्ये संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये भारतीय आद्य शिक्षिका समाज क्रांतिकारक, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रम मुख्याध्यापक हावळे बी.ए. यांच्या मुख्य उपस्थितीमध्ये संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी 'तया तयास मानव म्हणावे का, शिकण्यासाठी जागे व्हा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या काव्यगीताचे गायन करून विद्यार्थ्यांनी त्यांना अभिवादन केले. याप्रसंगी मुख्याध्यापक हावळे बी.ए. यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये महात्मा फुले यांच्या समाजकार्य सहकार्य आणि प्रेरणा यांचा अंगीकार करून जीवनाच्या अंतिम क्षणापर्यंत समाजाच्या उन्नतीसाठी कार्य केले असे विचार प्रतिपादन करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे संचालन पवळ यु.बी. प्रास्ताविक मेश्राम एस. बी. आणि आभार प्रदर्शन वाघमारे डब्ल्यू. एस. यानी केले. याप्रसंगी सय्यद ए.एन, घुले आर.बी, श्रीमती.मुंडे एन.जी, गायकवाड एन.पी, भारत कोळेकर, हजारे एल.बी. सुभाष गायकवाड, तसेच सेवानिवृत्त शिक्षक विजय देशमुख, आनंद छात्रालयाचे अधिक्षक खरसाडे डी.व्ही. आणि बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाला एक हजार कोटी निधी द्या-चांदणे

सिरसदेवी दि १० (प्रतिनिधी)-मातंग समाजातील तत्सम जातींची उन्नती व प्रगती साधायची असेल तर साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ पूर्ववत आणि प्रभावीपणे सुरू करण्यासाठी या मंडळाला एक हजार कोटी रुपयांचा निधी द्यावा अशी मागणी विजय चांदणे यांनी केली आहे.लोकसभा व विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्र राज्यातील मातंग समाजाने महायुतीला मतदार केले आहे यांची जाणीव महायुती सरकारने ठेवून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाला एक हजार कोटी चा निधी द्यावा रामदास आठवले व संजय शिरसाट मातंग समाजाच्या विविध प्रश्नकाडे लक्ष द्यावे तुम्ही समाज



कल्याण मंत्री आहात हे विसरू नका. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे , उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार माझ्या गोरगरीब मातंग समाज कडे लक्ष द्या . आमच्या या मागण्या मान्य झाल्या नाही तर लवकरच आंदोलन करणार असा इशारा लहुजी शक्ती सेनेचे मराठवाडा युवक अध्यक्ष विजय चांदणे यांनी दिली आहे

# मावलाई श्री पत्रकारिता, क्रीडा, सामाजिक पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

बीड दि १० (प्रतिनिधी)- गेवराई तालुक्यातील मावलाई युवक क्रीडा मंडळ व व्यायामशाळा बर्हाणपूर यांच्या विद्यमाने मावलाई देवी यात्रे निमित्ताने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणार्या व्यक्तींना राजस्तरीय पुरस्कार दिले जातात. यावर्षी मावलाई श्री पत्रकारिता, क्रीडा, सामाजिक राज्यस्तरीय पुरस्कार दिले जाणार असून यासाठी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. या वर्षी पत्रकारिता पुरस्कार, धार्मिक लिखाण करणारे व त्यावर शोधवार्ता करणार्या पत्रकारांना हा पुरस्कार दिला जाणार आहे. तसेच सामाजिक क्षेत्रात समाजासाठी उल्लेखनीय कार्य व त्याचा समाजाला झालेला फायदा हा समाज सेवकाला पुरस्कार दिला जाणार आहे. क्रीडा क्षेत्रात प्रचार व प्रसार अनेक खेळाडू तयार करुन किती खेळाडू शासकीय नौकरीत लावले, तसेच शिवछत्रपती पुरस्कार मिळाला असेल तर अशा उत्कृष्ट क्रीडा खेळाडूस, प्रशिक्षकास हा राज्यस्तरीय मावलाई क्रीडा पुरस्कार दिला जाणार आहे. या पुरस्कार निवडीसाठी समिती नेमण्यात आली असून ज्येष्ठ पत्रकार प्रमोद कुलकर्णी, पत्रकार दिनेश लिंबेकर, धनंजय बजगुडे, सुशील देशमुख व अविनाश वाघीरकर हे काम पहाणार आहेत. या पुरस्कारासाठी रोख रक्कम, शाल, श्रीफळ, सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. दि.२० मार्च २०२६ पर्यंत भागवत वराट, संत नामदेव नगर (पूर्व) बीड, मो.९१७२८४२१६३ अथवा धनंजय बजगुडे पाडळशिंगी ता.गेवराई या पत्त्यावर आपण केलेले कार्य व वर्तमानपत्राचे कात्रण फोटोसह पाठवावे असे आवाहन विष्णु यादव, भागवत वराट यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.

स्मृतिदिन विशेष ११ मार्च

# मृत्यूलाही लाजवणारा महायोद्धा 'छत्रपती संभाजी महाराज'

फक्त बत्तीस वर्षांचे आयुष्य, नऊ वर्षांचे राज्य आणि चाळीस दिवसांचा अमानुष छळ. पण या सर्व परिस्थितींना तोंड देताना छत्रपती संभाजी महाराजांनी जे अभूतपूर्व धैर्य दाखवले, जो आत्मसन्मान जपला आणि जे बलिदान दिले, त्याला जगात तोड नाही, ते भारतीय इतिहासातील सर्वात उज्ज्वल पान आहे. आज त्यांच्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने त्यांना अभिवादन करताना, आजच्या पिढीने त्यांच्याकडून काय घ्यायला हवे, याचा ऊहापोह करणे अत्यंत समयोचित आहे.

**शिवछत्रपतींचा वारस, स्वतंत्र व्यक्तिमत्त्व**

छत्रपती संभाजी महाराज हे केवळ शिवाजी महाराजांचे पुत्र म्हणून ओळखले जाणे अपुरे आहे. ते स्वतः एक स्वतंत्र, परिपूर्ण आणि असाधारण व्यक्तिमत्त्व होते. वयाच्या नवव्या वर्षी आग्र्याला औरंगजेबाच्या दरबारात जाणे आणि त्या धोकादायक परिस्थितीला तोंड देणे, हे त्यांच्या धाडसाचे बालपणीचेच दर्शन होते. शिवाजी महाराजांच्या निधनानंतर सिंहासनावर बसताना एकीकडे अंतर्गत कट-कारस्थाने होती, तर दुसरीकडे औरंगजेबाच्या प्रचंड मोगल सेनेचे आव्हान होते. या दोन्ही आघाड्यांवर त्यांनी जे नेतृत्व दिले, ते अतुलनीय होते.

**योद्धा आणि विद्वान : एक अष्टपैलू राजा**

संभाजी महाराजांबद्दल एक मोठा गैरसमज आहे की ते केवळ लढाया लढले, ते शूर वीर, पराक्रमी तर होतेच, पण ते एकाच वेळी असामान्य योद्धे आणि प्रकांड विद्वान होते, संस्कृतसह अनेक भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. 'बुधभूषण' हा संस्कृत ग्रंथ, 'सातसतक', 'नखशिख' आणि 'नायिकाभेद' या रचना त्यांनी केल्या. रणांगणावर तलवार चालवताना एकीकडे ग्रंथरचना करणे, हे त्यांच्या असाधारण बुद्धिमत्तेचे आणि अष्टपैलूत्वाचे दर्शन घडवते. युद्धाच्या काळातही शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होणार नाही, रयतेला त्रास होणार नाही याची काळजी ते स्वतः घेत. शिवाजी महाराजांचा रयतेचा राजा हा वारसा त्यांनी निष्ठेने जपला.

**चाळीस दिवसांचे बलिदान : इतिहासातील उज्ज्वल पान**

फेब्रुवारी १६८९. संगमेश्वर येथे दगाबाजीमुळे पकडले गेलेले संभाजी महाराज औरंगजेबासमोर आणले गेले. औरंगजेबाला वाटले होते की हा राजा शरण येईल, गुढघे टेकेल, शरण येईल, स्वराज्याची माहिती देईल, पण पुढे



जे घडले ते इतिहासाने कधीही विसरता कामा नये. चाळीस दिवस अमानुष छळ सहन करूनही संभाजी महाराजांनी शरणागती पत्करली नाही. शरीरावर असह्य अत्याचार होत असताना त्यांनी मान झुकवली नाही, स्वराज्याचे किल्ले आणि माहिती देण्यास ठाम नकार दिला. ११ मार्च १६८९ रोजी तुळापूर येथे त्यांना हाल-हाल करून शहीद करण्यात आले, हे बलिदान म्हणजे केवळ एका राजाचा मृत्यू नव्हता, ते मृत्यूलाही लाजवणारे शौर्याचे सर्वोच्च शिखर होते.

**नावाचा वापर समाजभेदासाठी नको**

गेल्या काही वर्षांत संभाजी महाराजांच्या अंत्यसंस्काराशी संबंधित वादग्रस्त दाव्यांचा वापर करून समाजात संभ्रम पसरवण्याचे आणि जातीय तेढ निर्माण करण्याचे प्रयत्न झाले आहेत. ज्या महाराजांनी आपले प्राण देऊन या देशाचे आणि समाजाचे रक्षण केले, त्यांच्या बलिदानाचा वापर समाज तोडण्यासाठी करणे हे त्यांच्या स्मृतीशी केलेला विश्वासघात आहे. संभाजी महाराज हे केवळ कोणत्या एका जातीचे वा समाजाचे नव्हते. ते या संपूर्ण देशाचे, इथल्या रयतेचे महाराज होते. जनतेने अशा प्रयत्नांना बळी न पडता त्यांच्या एकता व स्वाभिमानाच्या संदेशाला पुढे नेत राहणे हीच खरी श्रद्धांजली आहे.

**आजच्या पिढीसाठी प्रेरणा**

आजच्या काळात जेव्हा आपण संकटांसमोर लवकर खचतो, प्रलोभनांसमोर झुकतो, स्वार्थासाठी तत्त्वे सोडतो, तेव्हा संभाजी महाराजांचे चरित्र एक जिवंत प्रेरणा म्हणून उभे राहते. मृत्यू समोर दिसत असताना, यातनांनी शरीर विव्हळत असताना, सगळ्या आशा संपल्या असतानाही त्यांनी आत्मसन्मान सोडला नाही. आजच्या तरुण पिढीने त्यांच्याकडून धैर्य शिकावे, प्रलोभनांना नकार देण्याची ताकद मिळवावी आणि आपल्या मातीशी, आपल्या माणसांशी असलेली बांधिलकी अखंड ठेवावी.

आज त्यांच्या स्मृतिदिनी एकच संकल्प घेऊया. त्यांच्या बलिदानाची आठवण केवळ एक दिवसापुरती न ठेवता त्यांचा विचार, त्यांची निडरता आणि त्यांची स्वराज्यनिष्ठा आपल्या जगण्यात उतरवूया. हेच त्यांना खरे अभिवादन असेल.

**- पुरुषोत्तम जाधव**
माजलगाव
मोबा. ९४२३७१६३५४



चौसाळा - येथील किराणा व्यापारी संदेश खिंवसरा यांच्या घरी जामखेड येथील कोठारी प्रतिष्ठानचे अध्यक्ष समाजिक कार्यकर्ते संजय कोठारी व प्रतिष्ठित व्यापारी राजेंद्रज कोठारी हे आले असता त्यांचा सत्कार करताना चौसाळा पत्रकार संघटनेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य विकास नाईकवाडे व्यापारी संदेश खिंवसरा, राशन दुकानदार उमेश जोगदंड , बाळूकाका नहार, रोशन खिंवसरा आदी.

# काँग्रेस पक्षाच्या मागणीला पाटोदा नगर पंचायतकडून साद

पाटोदा (प्रतिनिधि) : पाटोदा शहरातील राज मोहम्मद चौक येथे होत असलेल्या वाहतुक कोंडी विषयी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस अँड.विशाल मस्के, पाटोदा तालुका अध्यक्ष राहुल जाधव, पत्रकार हमीदखान पठाण व इतर कार्यकर्ते यांनी पाटोदा पोलिस स्टेशन व नगर पंचायत पाटोदा यांना लेखी निवेदन देऊन कळविले होते की;

पाटोदा शहरातील राज मोहम्मद चौक हा रहदारीचा चौक असुन १) पारगांव रोड, २) महासांगवी रोड, ३) बीड, मांजरसुंबा मार्गे येणारा मुख्य रोड, ४) पाटोदा शहराचे बाजारतळातुन येणारा मुख्य रोड असे प्रमुख रस्ते या चौकात येऊन मिळतात. जामखेड ते सौताडा मार्गे चुंबळीफाटा या राष्ट्रीय महामार्गाचे काम सद्यस्थितीत चालु असल्याने बीड व मांजरसुंबा मार्गे जामखेड कडे येणारी व जाणारी बरीचशी वाहने ही या चौकातुन जात आहेत. त्यामुळे या चौकात वाहतुकीची कोंडी होताना दिसत असुन यामुळे जीवीत हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे योग्य ते नियोजन करून राज मोहम्मद चौक येथील वाहतुक नियंत्रणात ठेवुन जिवीत हानी टाळली जावी या करीता योग्य ती उपाय योजना करण्याची मागणी केल्यावरून पाटोदा नगर पंचायत यांनी पोलिस निरिक्षक साहेब, पोलिस स्टेशन पाटोदा यांना दि. ०४/०३/२०२६ रोजी पत्र देऊन पाटोदा येथील राज मोहम्मद चौकात वाहतुक पोलिसांची नियुक्ती करावी, वाहतुक नियंत्रणाची उपाय योजना करावी, व आवश्यक ती कडक कारवाई करण्यात यावी . सदर बाबींकडे तातडीने लक्ष देऊन त्वरित कार्यवाही करण्यात यावी यासाठी नगर पंचायत पातळीवरून आवश्यक ते सहकार्य करण्यात येणार असल्याचे कळवण्यात आले आहे.

त्यामुळे पाटोदा शहरातील राज मोहम्मद चौकातील वाहतुक नियंत्रण पोलिस प्रशासन व नगर पंचायत पाटोदा योग्यरित्या करतील व वाहतुक सुरळीतपणे करून जिवीतहानी टाळतील अशी अपेक्षा जनतेकडुन व्यक्त केली जात आहे, त्याच बरोबर काँग्रेस पक्षाने घेतलेल्या पुढाकाराचे देखील सर्व स्तरातुन कौतुक होत आहे. यावेळी पत्रकारांशी बोलताना काँग्रेस पक्षाच्या मागणीला यश आले असल्याचे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस अँड. विशाल मस्के यांनी सांगितले

# ब्रह्मकुमारीज सेवा केंद्रात महिलांचा सन्मान व सशक्तीकरणाचा संकल्प




अंबाजोगाई दि १० (प्रतिनिधी) : येथील प्रजापिता ब्रह्मकुमारीज सेवा केंद्र येथे आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून महिलांचा सन्मान व सशक्तीकरणाच्या प्रेरक संकल्पावर वाटचाल करण्यासाठी विशेष कार्यक्रम २०० च्या वर महिलांच्या उपस्थितीत आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पूर्वसंध्येला घेण्यात आला. अशी माहिती अंबाजोगाई सेवा केंद्र, आनंद सरोवरच्या संचालिका राजयोगिनी ब्र.कु.सुनीता दिदी यांनी दिली आहे.

या कार्यक्रमास मुख्य मार्गदर्शिका आ.राजयोगिनी ब्र.कु.सुनीता दिदी या होत्या. तर या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती आश्विनी जिरंगे या होत्या, तर यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मिसेस महाराष्ट्र डॉ.सुनीता तोंडगे, शिक्षणतज्ज्ञ सौ.स्वरूपा कुलकर्णी, ब्युटीशियन सौ.स्मिता हिरळकर, उद्योजिका सौ.अलका देशपांडे आणि विधिज्ञ ॲड.एम.बी.धायगुडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. यामध्ये महिला सशक्तीकरणा सोबतच स्वावलंबन, आत्मनिर्भर, आत्मसन्मान याचे महत्व स्पष्ट करून महिलांची जनजागृती करण्यात आली. वंदेमातरम - स्वर्णिम भारताचे हे अभियान गतीने पुढे नेण्यासाठी प्रजापिता ब्रह्मकुमारीज यांचे योगदान मोलाचे ठरत आहे. या योगदानात आध्यत्मिक आणि नैतिक मूल्यांची जपणूक करीत एक सुवर्ण राष्ट्र निर्माण करण्याची प्रेरणा व शक्ती स्त्रीयां मध्ये आहे असे महत्त्वपूर्ण विचार बी.के.सुनीता दीदी यांनी व्यक्त केले. तर स्त्रीयांचा सन्मान हा फक्त महिला दिनी नसून तो प्रत्येक क्षणी व्हावा अशी अपेक्षा कार्यक्रमाच्या अध्यक्षा श्रीमती आश्विनी जिरंगे यांनी व्यक्त केली. यावेळी प्रमुख अतिथी यांचेकडून ही स्त्रीचे समाजजीवनातील महत्व, कार्य व योगदान याबाबत मौलिक असे विचार व्यक्त करण्यात आले. या कार्यक्रमात अंबाजोगाई शहरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून उपस्थितांचे आभार बी.के.मंजू दीदी यांनी मानले.

## महिलांच्या हाती शिक्षणाचे शस्त्र दिल्यामुळे अनिष्ट रूढी आणि परंपरातून मुक्तता मिळाली - प्राचार्य डॉ. नामदेव सानप

छत्रपती संभाजीनगर दि.१०(प्रतिनिधी) स्वातंत्र्यपूर्व कालखंडात संपूर्ण समाज सामाजिक आणि धार्मिक अनिष्ठ रूढी आणि परंपरात गुरफटलेला होता. त्यांना झुगारून महिलांच्या हाती शिक्षणाचे शस्त्र क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी तत्कालीन समाजाचा रोष पत्करून दिल्यामुळेच महिलांची अनिष्ट रूढी आणि परंपरांच्या विळख्यातून सुटका होऊ शकली. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. नामदेव सानप यांनी व्यक्त केले.

छत्रपती संभाजीनगर येथील मॉडर्न महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. सानप हे बोलत होते. या प्रसंगी व्यासपीठावर प्रा. डॉ. अस्मिता साळवे, रितेश साळवे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी प्रा. डॉ. अस्मिता साळवे म्हणाल्या की, सावित्रीबाई फुले यांच्या धाडसामुळे महिलांना शिक्षणाचे प्रवेशद्वार खुले झाले. महिलांच्या जीवनात क्रांती घडवून आणण्यात शिक्षणाचा मोठा वाटा आहे. रितेश साळवे म्हणाले की, सावित्रीबाईंनी महिलांच्या जीवनात क्रांती घडवून आणली. महिलांनी आता सामाजिक क्रांती घडवून आणण्यासाठी पुढे आले पाहिजे. यावेळी सध्या पंडित यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक व सूत्रसंचालन प्रा. डॉ. राजेंद्र भगत यांनी केले.

# ज्येष्ठ विधीज्ञ ॲड.विठ्ठलराव तिडके यांचा ७५ अमृत महोत्सव साजरा



माजलगाव (प्रतिनिधी) : येथील माजलगाव वकील संघाचे जेष्ठ विधिज्ञ ॲड.विठ्ठलराव तिडके यांचा ७५ वा अमृत महोत्सव साजरा माजलगाव वकील संघाच्या वतीने दि. १० मार्च मंगळवार रोजी साजरा करण्यात आला.

यावेळी वकील संघाचे ज्येष्ठ विधिज्ञ मंडळी उपस्थित होती,ॲड.विठ्ठलराव तिडके साहेब यांच्या जीवनावर ॲड.एस.आर शर्मा, ॲड.एम.ए.डोंगरदिवे, ॲड.बि.आर.डक, ॲड.एस.यु.सोळंके, ॲड.एन.आर.गोले, ॲड.बादाडे यांनी मनोगत व्यक्त केले.तर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन वकील संघाचे सचिव ॲड.नारायण तेलगड यांनी केले व कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून वकील संघाचे अध्यक्ष ॲड.मनसबदार हे होते. सदरील कार्यक्रमास सिनियर ॲड.टि.एन.कोल्हे, ॲड.यु.डी.मोरे,ऍड गवते, ॲड.सजगणे, ॲड.फपाळ, ॲड.विजय मस्के,ॲड.राऊत,ॲड.निंबाळकर, ॲड.राठोड, ॲड.आडे, ॲड.तिडके, ॲड.कुंभार, ॲड.गरड, ॲड.सोनवणे, ॲड.शिंदे, ॲड.होरमाळे, ॲड.खेत्री, ॲड.बोचरे, ॲड.कुलकर्णी,हिंगण यांच्यासह आदी उपस्थित होते.

# बी.फार्मसी महाविद्यालय येथे महिला सशक्तीकरणाचा संदेश




अंबाजोगाई दि १०(प्रतिनिधी) - येथील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचालित बी.फार्मसी महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस) विभागाच्या वतीने जागतिक महिला दिन साजरा करताना मंडळाचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी आणि कार्यकारी संचालक संकेत मोदी यांच्या संकल्पनेतून महिला सशक्तीकरणाचा संदेश देण्यात आला.

सुरूवातीस प्रमुख पाहुण्या घाटनागनाथ प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.संध्या सोळंके यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन करण्यात आले. यावेळी प्रा.मंजूषा करेप्पा यांनी उपस्थितांचे स्वागत करून कार्यक्रमाची रूपरेषा मांडली तसेच उपस्थित मान्यवर, प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी ना महिलांच्या योगदानाचा गौरव करत महिला सशक्तीकरणाचा संदेश दिला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संतोष तरके यांनीही मनोगत व्यक्त केले. शेवटी राष्ट्रीय सेवा योजना विभागप्रमुख प्रा.मंदार चौधरी यांनी सर्व मान्यवर, प्राध्यापक, कर्मचारीवर्ग व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

## जाहीर प्रगटन

**तहसीलदार, बीड यांचे न्यायालयात**

जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ३८३/२०२६

**अशोक उत्तमराव घोळवे** विरुध्द **मुख्याधिकारी, न.प.बीड**

पहा

**१) अशोक उत्तमराव घोळवे,** रा.धांडेनगर, बीड ता.जि.बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक पंकज अशोक घोळवे यांचा दिनांक ०३/०१/२०१२ रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास ता.बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहून मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहून जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे न.प.बीड ता.जि.बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १०/३/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख १०/०४/२०२६ ही आहे.

16578

**तहसिलदार बीड**

## लाडक्या बहिणींना पिठाची गिरणी, शिलाई मशीन, भांड्याचे किट देण्याच्या योजनेच्या नावाखाली

# महिलांना फसवणाऱ्या ठगाला अंमळनेर पोलिसांनी केली अटक



पिंपळवंडी दि.१०(प्रतिनिधी) : महिलांना फोन करून तुम्ही ''लाडक्या बहिणी'' योजनेच्या लाभार्थी असल्याने तुमची शासनाने विशेष लाडकी बहीण म्हणून निवड झालेली आहे.या माध्यमातून तुम्हाला पिठाची गिरणी, शिलाई मशीन व भांड्याचे किट मिळणार आहे.त्यासाठी ट्रान्सपोर्टचे भाडे म्हणून अगोदर ऑनलाईन भाड्याचे पैसे द्यावे लागणार आहेत तसेच फोन पे वर २५०० रुपये पाठवा,मी समाज कल्याण अधिकारी बोलत आहे.यावर विश्वास ठेवून पिंपळवंडी ता.पाटोदा येथील पाच महिलांनी मिळून ९ हजार रुपये जमा करून पाठविले.

सदर रक्कम पाठवूनही सदरील वस्तू व कीट आलेले नसल्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच सदर महिलेने अंमळनेर पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरुद्ध दि. १५/२/२०२६ रोजी तक्रार दिली होती.त्याप्रमाणे अंमळनेर पोलीस ठाण्याचे स.पो.नी.भार्गव सपकाळ यांच्या मार्गदर्शनात तपासाची चक्रे वेगाने फिरली.या गुन्ह्यातील महिलांना फसवणारा ''ठग'' हा गोरक्षनाथ नवनाथ पन्हाळकर रा. नाळवंडी ता.पाटोदा (ह.मू.तळेगाव, बीड.) निष्पन्न होतास त्यास अंमळनेर पोलीस ठाण्याचे स.पो.नी.भार्गव सपकाळ,पो.कॉ.योगेश बहिरवाळ, व महिला पोलीस अमलदार यांनी जालना येथील रेल्वे स्थानक परिसरातून दि.९/३/२०२६ रोजी ताब्यात घेऊन अटक केली.व त्याच्या विरुद्ध गुन्हा रजिस्टर नंबर २१/ २०२६ अन्वये कलम ३१८/४ भा.न्या.संहिता अन्वये गुन्हा दाखल केला आहे.अंमळनेर पोलीस तपासासाठी त्याच्या मागावर असताना सदरील गुन्ह्याचे तपासामध्ये जवळपास २५ ते ३० मोबाईल नंबर चे सीडी आर काढून त्याहून हजारो मोबाईल क्रमांकाची पडताळणी करण्यात आली.सदरील ''ठग'' हा वारंवार सिम कार्ड बदलत असल्याने व मोबाईल चालू बंद करत असल्याने तपास कार्यात अडचण येत असे,तांत्रिक मदतीच्या साह्याने व अतिशय बारकाईने तपास करून ठगास ९/३/२०२६ रोजी जालना शहरातून ताब्यात घेण्यात आले.व अटकेची कारवाई करण्यात आली. सदर ढग हा वेगवेगळे सिम कार्ड वापरून नांदेड,परभणी,छत्रपती संभाजीनगर, पुणे, अहिल्यानगर भागात हुलकावणी देत होता. सदरील ठगाच्या अटकेची कारवाई स.पो.नी.भार्गव सपकाळ पो.कॉ. योगेश बहीरवाळ, होमगार्ड दिलीप घोशीर,महिला होमगार्ड पूजा तिपटे,शितल पवळ यांनी केली आहे.व पुढील तपास कामात उपनिरीक्षक कृष्णा चव्हाण, पो.ह.बबन शिंदे,विलास माळी,भरत राठोड,शाम खाडे,संतोष कसाब, गणेश गोसावी,मारुती म्हेत्रे,शत्रुघन दिंडे,चालक ईसूफ शेख हे मदत करीत आहेत.

दै.पार्श्वभूमी,बीड Date-11/03/2026

**CHANGE IN NAME**

I DECLARED BY THIS PUBLICATION
ABOUT CHANGE IN MY NAME OF
**OLD NAME - PRATAP PRAVIN MISAL**
**Change In to My New Name :**
**PRATAPSINH PRAVIN MISAL**
Address-307, Hanuman Mandir, Javhar
Coloni, Nagar Road, Beed, Bid, Po.Beed,
Dist.Beed, MH 431122 Mob. : 7020345755

16577

## चौसाळा राम जन्मोत्सवाच्या अध्यक्षपदी देशमुख तर सचिवपदी वेदपाठक

चौसाळा दि १० (प्रतिनिधी) : बीड तालुक्यातील चौसाळा येथे राम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो . यानिमित्त राम जन्मोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष संदेशशेठ खिवंसरा यांच्या अध्यक्षतेखाली हनुमान मंदिरात बैठक संपन्न होऊन मार्गदर्शक बाळू काका नहार महादेव बाप्पा नाईकवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रसाद ( बाबू) देशमुख यांना राम जन्मोत्सवाचे अध्यक्ष म्हणून निवडण्यात आले तर उपाध्यक्ष म्हणून आकाश काळे कोषाध्यक्ष म्हणून कुमार मिटकरी सचिव म्हणून रविराज वेदपाठक यांची निवड करण्यात आली .

राम जन्मउत्सवाचा कार्यक्रम बंकट शिंदे, अक्षय भैय्या हुलजुते, महावीर लिंगे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत यशस्वीरित्या पार पाडण्याचे या बैठकीत ठरवण्यात आले बैठकीमध्ये प्रसिद्धी प्रमुख म्हणून दैनिक कार्यारंभ चे पत्रकार व ग्रामपंचायत सदस्य विकास नाईकवाडे, दैनिक लोकप्रश्न चे वार्ताहार विकास सर्वज्ञ यांची निवड करण्यात आली तसेच वेगवेगळ्या जबाबदाऱ्या ठरवून देण्यात आल्या राम जन्मोत्सवा दिवशी झांज पथक, तलवारबाजी व साहसी खेळ यांचे आयोजन करण्यात येईल असे जन्मोत्सव समितीच्या वतीने कळविण्यात आले या नूतन कार्यकारिणीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे चौसाळाचे प्रथम नागरिक बाबुशेठ लोढा, माजी सरपंच मधु (भाऊ) तोडकर, अंगद शिंदे, ग्रामपंचायत सदस्य गौतम नाईकवाडे सामाजिक कार्यकर्ते पंजाब राऊत, उमेश जोगदंड, दैनिक पार्श्वभूमीची प्रतिनिधी पंडित जोगदंड, यांनी सर्वांचे अभिनंदन केले यावेळी बैठकीस आनंद चौसाळकर, महेश पवार, तन्मय देशमुख तसेच अनेक मान्यवर व प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पार्श्वभूमी

## सेवानिवृत्त एस टी कर्मचारी जगदीश सिकची यांचे निधन



किल्ले धारूर दि १०(प्रतिनिधी)- शहरातील एस.टी.महामंडळातील सेवानिवृत्त कर्मचारी जगदीश कचरुलाल सिकची वय ६० वर्ष यांचा दोन दिवसांपूर्वी शनिवारी सायंकाळी अपघात झाला होता. जगदिश सिकची यांच्या वर लातुर येथील सह्याद्री हॉस्पिटल येथे उपचार सुरू होते. त्यांना उपचारा दरम्यान हृदयविकाराचा धक्का पान २ वर

## महिला आयोगाला निधीची कमतरता भासू दणार नाही–राज्यमंत्री बोर्डीकर

मुंबई, दि. १० – राज्य महिला आयोगाच्या मागणीनुसार शासनामार्फत निधी उपलब्ध करुन दिला जातो. आयोगाला निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, असे महिला व बालविकास राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी विधानसभेत सांगितले. आयोगास मागणीनुसार दरवर्षी निधी वाढवून दिला जात असून यावर्षी १८ कोटी ३५ लाखांची तरतूद करण्यात येत असल्याची माहिती श्रीमती बोर्डीकर यांनी यावेळी दिली.

# खालापुरी येथे सर्वच शिक्षकांची अनुपस्थिती ; शिक्षणाधिकारी डॉ.कुंवर यांनी घेतला परिपाठ







### शिक्षकांवर होणार कारवाई

बीड दि. १० (प्रतिनिधी):-बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी डॉ. किरण कुंवर यांनी शिरूर (कासार) तालुक्यातील खालापुरी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेवर मंगळवारी अचानक सकाळी भेट दिली. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक अनुपस्थित असल्यामुळे शिक्षणाधिकारी यांनी स्वत: परिपाठ घेऊन शाळा सुरू केली. या अनुपस्थित शिक्षकावर गेवराई तालुक्यातील रांजणी शाळेप्रमाणेच मोठी कारवाई करण्यात येणार असल्याचे समजते. बीड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या प्रभारी शिक्षणाधिकारी डॉ. कुंवर यांनी अल्पावधीतच सर्व अधिकारी, कर्मचारी, आणि जिल्ह्यातील शिक्षकांना शिस्त लावण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. दहावी व बारावी परीक्षेतील त्यांनी केलेल्या उपाय योजनेमुळे त्या चर्चेत आल्या आहे. गुरुवार दि. ४ मार्च रोजी राणी शाळेला भेट दिली होती. त्यावेळी तेथे सर्वच शिक्षक पान २ वर

#### सर्वत्र विदारक परिस्थिती

**जिल्ह्यात अनेक ठिकाणी अशीच विदारक परिस्थिती आहे. काही ठिकाणी शिक्षक वेळेवर उपस्थित राहत नाहीत. अनेक शिक्षक गैरहजर असतात. शिक्षण विस्तार अधिकारी आणि केंद्रप्रमुख अशा प्रकाराकडे डोळेझाक करताना दिसून येते. पर्यवेक्षीय यंत्रणा पर आणि सक्रिय करण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे.**

### जे.डी.शाहंच्या पाठपुराव्याला यश

## आरटीईच्या प्रवेशामधील १ कि.मी.ची जाचक अट रद्द



बीड दि.१०(प्रतिनिधी):- राज्यातील आरटीई २५% मोफत प्रवेश प्रक्रियेत राज्य सरकारने लादलेली '१ किलोमीटर अंतराची अट' अखेर रद्द करण्यात आली आहे. समाजसेवक जे. डी.शाह यांनी या अन्यायकारक निर्णयाविरोधात मुंबई येथे सुरू असलेल्या अर्थ संकल्प अधिवेशन दरम्यान राज्यातील सर्व विधानसभा व विधानपरिषद सदस्य यांना या संदर्भात आवाज उठविण्यासाठी लेखी वजा विनंती करीत म्हटले होते की आरटीई प्रवेशाच्या १ किलोमीटर अट कायद्यात कुठेही नाही.शिक्षण हक्क कायदा हा केंद्र सरकारचा आहे.त्यात राज्य सरकार सुधारणा करून एक किलोमीटर अट. लादणे म्हणजे एका हाताने अधिकार देऊन दुसऱ्या हाताने काढून घेण्यासारखं आहे. दरम्यान शिक्षण हक्क कायदा हा सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या पान २ वर

### विकास शुल्क आणि शैक्षणिक फी आगाऊ वसूल केल्यास

## तर महाविद्यालयावर कारवाई करणार –मंत्री हसन मुश्रीफ



मुंबई, दि.१० : शिष्यवृत्तीधारक आणि आरक्षित प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयांनी विकास शुल्क आणि शैक्षणिक फी आगाऊ वसूल करू नये, यासाठी राज्य सरकार लवकरच शासन निर्णय निर्गमित करणार असल्याची घोषणा वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी विधान सभेत केली.प्रश्नोत्तराच्या तासात आ.योगेश सागर यांनी राज्यातील शासकीय व मान्यता प्राप्त वैद्यकीय मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागास वर्गातील मुलींना शिक्षण व परीक्षा शुल्क प्रतिपूर्तीबाबत प्रश्न विचारला होता. मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले की, विद्यार्थ्यांकडून अनावश्यक विकास शुल्क (Development Charges) आकारले जाऊ नयेत, यासाठी आदेश काढले जावेत याबाबत उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांच्याशी चर्चा करण्यात येणार आहे.काही महाविद्यालये फी प्रतिपूर्ती होईल की नाही, या शंकेतून विद्यार्थ्यांकडून पैसे घेतात. महाविद्यालयांनी फी प्रतिपूर्तीच्या नावाखाली विद्यार्थ्यांची अडवणूक केल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. गेल्या दोन वर्षांतील आकडेवारी पाहता राज्य शासनाने १००% फी प्रतिपूर्ती केली आहे. वित्त विभाग देखील शैक्षणिक बाबीसाठी निधी विहित वेळत देण्यासाठी आग्रही आहे. महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून फी वसूल करू नये, यासाठी शासन तातडीने कार्यवाही करेण असेही मुश्रीफ यांनी सांगितले.

### पोलीसास मारहाण व शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याच्या आरोपातून

## दोन आरोपींची निर्दोष मुक्तता

बीड दि १० (प्रतिनिधी) कोविड-१९ चा संसर्ग चालू असताना घराबाहेर निघून रहदारीस अडथळा निर्माण करून इतर माणसाच्या जीवितला धोका निर्माण केला व पोलिस कर्मचारी यास मारहाण व त्यांच्या सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याच्या आरोपातून दोन आरोपीची माननीय सत्र न्यायाधीश साहेब यांनी निर्दोष मुक्तता केली. याबाबत सविस्तर वृत्त असे की, दिनांक २१ मे २०२१ रोजी फिर्यादी नामे अशोक गुंडाजी एडके, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, जालना पोलीस स्टेशन यांनी गेवराई पोलीस स्टेशनला तक्रार दिली की, दिनांक २१ मे २०२१ रोजी फिर्यादी आणि इतर सरकारी कर्मचारी हे नॅशनल हायवे ५२ वर शहागड खामगाव चेक पोस्टवर कोविड काळात ड्युटीवर होते. ते तेथे कर्तव्यावर असताना त्या दिवशी एक मोटरसायकलवर तीन इसम त्यांना येत असताना दिसले, त्यांनी सदर इसमांना गाडी थांबविण्यास सांगितले असता, त्यावेळी सदर इसमानी त्यांच्या तोंडाला मास्क लावलेला नव्हता. पोलिसांनी त्याबाबत व गाडीच्या लायसन्स बाबत विचारणा केली असता त्यांनी पोलीसासोबत हुज्जत घालण्यास सुरुवात केली. आरोपी पोलिसांना म्हणाले, आम्ही मास्क बांधणार नाही, आमच्याकडे लायसन्स नाही, तुम्हाला काय करायचे ते करा, आम्हाला ताण देऊ नका. त्यांनी पोलिसांना शिवगाळ केली व झटापट करत असताना पोलिसाच्या डाव्या हाताच्या बोटावर व मनगटावर पान २ वर

## आई-वडील रागावल्यामुळे मुलाने केली आत्महत्या



आष्टी दि १०(प्रतिनिधी)- घरगुती कामाकडे दुर्लक्ष केल्यावरून आई-वडील रागवल्याने त्याचा राग मनात धरून २१ वर्षांच्या एकुलत्या एक मुलाने गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपविल्याची धक्कादायक घटना आष्टी तालुक्यातील सांगवी (पाटण) येथे मंगळवारी सकाळी घडली. विराज हरिदास भगत असे मृत तरुणाचे नाव आहे.विराज हा घरच्या कामात मदत करत नसल्याने त्याचे आई-वडील त्याच्यावर रागावले होते. पालकांनी टोकल्याचा राग मनात धरून विराजने मंगळवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास गावातील 'काळशेत' शिवारातील सर्व्हे नं. ११९ मधील आपल्या शेतात जाऊन आंब्याच्या झाडाला गळफास घेतला. शेतात गेलेल्या त्याच्या बहिणीच्या ही बाब निदर्शनास आल्यानंतर ही हृदयद्रावक घटना समोर आली. घटनेची माहिती मिळताच पालकांनी धाव घेऊन त्याला तातडीने खाली उतरवले आणि कडा येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले. विराजच्या पश्चात आई, वडील पान २ वर

## वाढत्या उन्हाने पिंपळनेरकर हैराण

### रसवंतीसह थंड पेय स्टॉलवर वाढली गर्दी



पिंपळनेर दि.१०(प्रतिनिधी):- मार्च महिन्याची सुरुवात होताच बीड तालुक्यात उन्हाचा कडाका वाढू लागला आहे. तसेच, वाढत्या उकाड्याने नागरिक हैराण झाले आहेत. यापासून संरक्षण मिळण्यासाठी नागरिकांची थंड पेयाच्या स्टॉलवर गर्दी वाढताना दिसत आहे. गेल्या आठवड्यापासून तालुक्यातील पिंपळनेरसह परिसरात तापमानात लक्षणीय वाढ झाली आहे. दिवसभर अंगाची अक्षरशः लाही लाही होत आहे. प्रखर उन्हामुळे दुपारच्या वेळेत रस्त्यांवरही वर्दळ कमी होताना दिसत आहे. उकाड्यापासून दिलासा मिळावा म्हणून थंड पेये, आईस्क्रीम पार्लर आणि रसवंतिगृहांवर गर्दी होत आहे. दिवस-रात्र उकाडा आणि त्यातच डासांचाही प्रादुर्भाव वाढला आहे. परिणामी, नागरिकांची पान २ वर

## सावित्रीमाईंच्या संघर्षाची जिवंत कहाणी ; मेघना झुंझम यांच्या एकपात्री प्रयोगाने प्रेक्षक भारावले




आष्टी (प्रतिनिधी) :- जागतिक महिला दिनानिमित्त आष्टी येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रेरणादायी सांस्कृतिक कार्यक्रमात 'मी तुमची सावित्रीबाई फुले' या प्रभावी एकपात्री प्रयोगाने उपस्थितांच्या मनावर अधिराज्य गाजवले. या प्रयोगात सौ. मेघना झुंझम (भिंबरपाटील) यांनी आपल्या दमदार अभिनयातून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनाची प्रेरणादायी गाथा सादर करत प्रेक्षकांची मने जिंकली.

आष्टी पंचायत समितीच्या प्रांगणात सोमवार, दि. ९ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता आष्टी तालुका दूध संघ,आष्टी नगरपंचायत कार्यालय,कासारी, मुर्शदपुर, शिंदेवाडी ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हा कार्यक्रम पार पडला. मुंबई महानंद संचालिका सौ. प्राजक्ता ताई सुरेश धस यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. परिसरातील महिलांसाठी हा कार्यक्रम प्रेरणा, मनोरंजन आणि समाजप्रबोधनाचा संगम ठरला.एकपात्री प्रयोगाद्वारे सौ.मेघना झुंझम यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनातील संघर्ष, स्त्री शिक्षणासाठी केलेले महान कार्य आणि समाजातील अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे धैर्य अत्यंत प्रभावीपणे सादर केले. पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू करणाऱ्या सावित्रीमाईंचा इतिहास, समाजाच्या विरोधाला न जुमानता त्यांनी केलेली लढाई आणि स्त्री शिक्षणाचा लावलेला दीप या प्रयोगातून जिवंत झाला.या सादरीकरणाने उपस्थितांना कधी भावूक केले तर कधी हसवले. स्त्री-पुरुष समानता, स्त्रीशक्ती, धाडस आणि पान २ वर



बीड - शहरातील सीए. बी.बी. जाधव व सीए नारायण गाडे यांनी भारतीय जनता पक्षाचे नेते नवनाथ शिराळे यांचे ज्येष्ठ चिरंजीव अ‍ॅड.गोविंद शिराळे पाटील यांचा नगरसेवक म्हणून निवड झाल्याबद्दल सत्कार केला. यावेळी पुणे येथील ज्येष्ठ वकील श्रीकांत अगस्ते, अ‍ॅड संदीप चोरगे, अ‍ॅड.सुहास कांदे ,कृष्णा नवनाथ शिराळे पाटील पुणे येथील वकील मंडळी इत्यादी यावेळी उपस्थित होते.

## परिचारिका अभावी प्रसूतीसाठी अनियमितता




किट्टी आडगाव दि १०(प्रतिनिधी) सध्या माजलगाव तालुक्यातील किट्टी आडगाव प्राथमिक आरोग्य केंद्र मध्ये अनुभवी परिचारिकांचे पदे रिक्त असल्यामुळे, लसीकरण, आरोग्य तपासणी शिबिर, यामध्ये अनियमितता येत आहे, किट्टी आडगाव प्राथमिक आरोग्य केंद्र हे गोदाकाठी असल्याने या केंद्र अंतर्गत जवळपास २५ ते ३० गावाचा संपर्क असुन केवळ परिचारिका अभावी येथील केंद्रामध्ये गर्भवती मातांच्या प्रसूती साठी अनियमितता येत असून अनुभवी परिचारिका पान २ वर

## स्त्रियांनी आत्मसन्मान जपत कुटुंबाची काळजी घ्यावी

### – नगराध्यक्षा शिफा मेहरीन बिलाल



माजलगाव दि.१०(प्रतिनिधी)- स्त्रियांनी आत्मसन्मान जपत कुटुंबाची काळजी घ्यावी असे प्रतिपादन नगराध्यक्ष शिफा मेहरीन बिलाल चाऊस यांनी केले. येथील भा.शि.प्र. संस्था अंबाजोगाई पान २ वर

## माजलगावच्या नवीन आणि जुन्या बसस्थानकात प्रवाशांवर रखरखत्या उन्हात व धुळीत थांबण्याची वेळ



माजलगाव दि १० (प्रतिनिधी)- राज्य परिवहन महामंडळाचे येथील सुस्थितीत असलेले बस स्थानक पाडून त्या ठिकाणी नवीन स्थानकाची उभारणी करण्यासाठी मागील पाच महिन्याखाली स्थानक पाडण्यात आले त्यामुळे तात्पुरत्या बस स्थानकात प्रवाशांना प्रचंड धुळीचा व गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. राज्य परिवहन महामंडळाचे बीड जिल्ह्यात सर्वात चांगले, मोठ्या क्षेत्रफळाचे व सुस्थितीत असलेल्या इमारतीत माजलगाव येथील बस स्थानक होते १०८४ साली हे बस स्थानक बांधण्यात आले होते. राज्य परिवहन महामंडळाने मराठवाडा विभागात अनेक ठिकाणी नव्याने बस स्थानके बांधण्याची निविदा काढली होती. त्यात माजलगाव, बीड, धारूर, तेलगाव ,परळी, गेवराई या बस स्थानकांचा समावेश होता. मात्र महामंडळाने निविदेनंतर काम दोन वर्षात पूर्ण करण्याचे नियम असताना तब्बल १५ महिन्यांनी काम सुरू पान २ वर

## नगर रोडवर रिटायर फौजीने असाही केला राडा




बीड दि १०(प्रतिनिधी)- शहरातील नगर रोड या मुख्य रस्त्यावर एका निवृत्त फौजीने गोंधळ घालत चहाचा गाडा पलटी केल्याची घटना घडली. या प्रकारामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले . या घटनेच्या वेळी काही नागरिकांनी शूटिंग करत व्हिडिओ सोशल मीडियावर टाकल्याने तो व्हायरल होत असून सदरचा माजी सैनिक नेमका कोण? याबाबत देखील चर्चा होत आहे

यासंदर्भात माहिती अशी की बीड शहरातील नगर रोड परिसरात अनेक लहान व्यावसायिक चहाचे गाडे, बेकरी व दूध विक्रीचे छोटे स्टॉल लावून आपला उदरनिर्वाह करत असतात. दरम्यान, एका रिटायर फौजीने रस्त्यावर येत हे गाडे अतिक्रमण असल्याचे सांगत संताप व्यक्त केला. यावेळी त्याने एकाचा चहाचा गाडा पलटी करत खुर्च्यांची तोडफोड केली.या घटनेदरम्यान रस्त्यावर मोठी गर्दी जमली होती. गाडा पलटी झाल्याने दूध व इतर साहित्य रस्त्यावर सांडले, तर गॅस पान २ वर


Hero

## पाहिजेत

दीपराज एजन्सीज
हिरो शोरूम माजलगाव येथे
खालील रिक्त पदासाठी त्वरित जागा भरणे आहे.

| | |
|---|---|
| पद | सेल्स मॅनेजर |
| संख्या | ०२ |
| शिक्षण | पदवीधर /१२ वी पास |

वरील रिक्त जागेसाठी इच्छुक उमेदवारांनी आपल्या बायोडाटा सहित मुलाखतीस यावे

: मुलाखतीचे ठिकाण :

**दिपराज एजन्सी हिरो शोरूम**

धारूर रोड,माजलगाव.

मो.नं.९४२२१८५०९३/८६९८३३३८३१


CMYK